**औरंगजेब** (१६५८-१७०७) हा शहाजहाननंतर गादीवर आला. हा अत्यंत कट्टर धर्माभिमानी होता. या कट्टरपणमुळे इस्लाम धर्माची खरी सेवा करण्याऐवजी त्याने आपले राज्यच दुबळे बनविले. तरीही त्याची सत्यनिष्ठा, प्रामाणिकपणा व चारित्र्यबळ या गुणामुळे या भयानक काळीही जैनधर्म समाजात वाढतच राहिला. डॉ. बर्नियर औरंगजेबाच्या काळात भारतात आला होता. तो म्हणतो की, "मी नग्न मुनींना मोठमोठया शहरी विहार करताना पाहिले, स्त्रिया व मुलीदेखील कसलाही संकोच न बाळगता त्यांचे दर्शन घेत असत."

"सेठ शांतिदास जौहरी" हे या काळातील एक अत्यंत श्रध्दाळू जिनेंद्रभक्त होते. ते अहमदनगर येथे रहात असत. औरंगजेबाने त्यांना आपले दरबारी बनविले होते. 'अरुणमणिजी' नावाच्या प्रसिध्द विद्वानांनी इ. स. १६५९ साली औरंगजेबाच्या काळातच 'अजितनाथ पुराण' नावाच्या महान ग्रंथाची रचना केली. (श्लोक ४०-४१) 'जगतराम' हा थोर विद्वान जैन कवि या काळातच होवुन गेला. त्यानेही अनेक आध्यात्मिक ग्रंथाची रचना केल्याची माहिती मिळते. पंडित बनारसीदासांचाही औरंगजेबाने सत्कार केला होता. यानीही या काळात अनेक जैन ग्रंथांची रचना केली.

पंडित विनादीलाल यांनी औरंगजेबाच्या कारकीर्दीतच वि. सं. १७४६ साली जैन मुनी श्री विश्वभूषण यांच्या भक्तामराची संस्कृत टीका लिहिली. त्या टीकेत त्यांनी 'चक्षु वैंसत्यं' हकीकत लिहिली आहे की, औरंगेजबाच्या राज्यात जैनांना जिनेंद्रमूर्तीच्या पूजादिकांचे पूर्ण स्वातंत्र्य होते.

औरंगजेबाच्या काळी सन १६८९ चांदखेडी जिल्हा कोटा, (राजस्थान) येथे भ. महावीरांचे मंदिर बांधण्यात आले. पंचकल्याणिक पूजा झाली. यावेळी रथोत्सवही मोठया उत्साहाने साजरा करण्यात येऊन मूर्तीची स्थापना करण्यात आली. प्रो. रामस्वामी अय्यंगार यांच्या शब्दात असे म्हणता येईल की, 'जैनांचे चरित्र, त्याग, विद्या आणि ज्ञान इतके उज्वल होते की, त्यांनी अल्लाउद्दीन खिलजी किंवा औरंगजेब यासारख्या कट्टर मुसलमान बादशहाकडूनही सन्मान प्राप्त केला.'

दिल्ली येथील लालकिल्ल्यासमोरील जैन लालमंदिरातील नगारखान्यात नेहमी नगारा वाजत असे. त्याविषयी शहाजहान बादशहाने तक्रार केली नाही तथापि औरंगजेब कट्टर होता. त्यांनी नगाऱ्याच्या आवाजामुळे सरकारी कामात व्यत्यय येतो या सबबीवर नगारा बंद करण्याचा हुकूम दिला. त्याच्या हुकूमाप्रमाणे नगारा कोणी वाजविला नाही पण नगा-याचा आवाज मात्र पूर्वीप्रमाणे येतच राहिला. ही बातमी समजमाच स्वत: औरंगजेब मंदिरात आला व आपल्या डोळयांनी पाहून नगारा कोणीही न वाजविता वाजतच आहे याची खात्री करुन घेतली व आश्चर्यचकितच झाला. त्याने ताबडतोब नगा-यावरील बंदी हुकूम काढून घेतला व जैन मंदिरात नगारा वाजविण्यास परवानगी दिली.

औरंगजेब उत्कृष्ठ राज्यकर्ता, प्रचंड साम्राज्याचा सम्राट व मुत्सद्दी म्हणून प्रसिध्द असला तरी इस्लाम धर्माच्या प्रसाराचे त्याने स्वीकारलेले धोरण त्याच्या कार्यास व मोगल राजवटीस काळीमा लावणारे ठरले. या काळात अनेक रजपूत, शीख इत्यादी हिंदु सरदाराना बाटवून मुस्लीम करण्याचे प्रयत्न औरंगजेबाने केले. गुरु अर्जुनदेव, गुरु तेजबहाद्दूर यांनी तर आपल्या धर्मरक्षणार्थ देहत्यागही स्वीकारला. अनेक हिंदु, बौध्द व जैन मंदिराची या काळात नासधूस करण्यात आली, त्यांचे मशिदीत रुपांतर करण्यात आले. त्यामुळेच सर्वसामान्य समाजाच्य मनात मुस्लीम धर्माविषयी तसेच मोगल राज्यकर्त्याविषयी घृणा निर्माण झाली. औरंगजेबाने स्वीकारलेल्या धर्मद्वेष्टया धोरणामुळे या काळात जैनधर्माने आपले अस्तित्व कायम टिकविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले. तथापि या काळात जैन साहित्य, कला इत्यादी विविध क्षेत्रामध्ये फारशी प्रगति झाली नाही.

**बहादूरशहा** (१७०७-१७१२) औरंगजेबानंतर मोगल घराण्याच्या सत्तेवर बहादूरशहा हा सम्राट म्हणून झला. या कारकिर्दीत अनेक जैन मंदिरे बांधण्यात आली. रथोत्सव साजरे केले. जैनांच्या धर्मकार्यात या

काळात कोणताही अडथळा किंवा विघ्न आले नाही. बहादूरशहानंतर एक वर्षाच्या काळासाठी सत्तेवर आलेल्या जहांदरशहा यानेही जैनधर्माच्या प्रसाराला किंवा धर्मकार्याला विरोध केलेला दिसत नाही.

**फरुखबहादूर** (१७१३ ते १७१८) या मोगल बादशहाचे राजकीय खजिनदार घाशिराम नावाचे जैन गृहस्थ होते. त्यांनी दिल्लीमध्ये जैन धर्माची प्रभावना केली. रामचंद्र छाबडा यांनी या काळातच दिल्ली येथे एक जैन मंदिर बांधले.

**मोहम्मदशहा** (१७१९ ते १७४८) हा अहिंसक असून जैनांचा फार मोठया प्रमाणावर आदर ठेवीत असल्याची माहिती मिळते. याच्य कारकिर्दीतच १७४६ साली जैन विद्वान पंडित रामचंद्र याने आदि (ऋषभदेव) पुराणाची प्रतिलिपी तयार केली. ती आज देखिल दिल्लीच्या धर्मपुरा पंचायत दिगंबर जैन मंदिरात सुरक्षित आहे. मोहम्मदशहाचे राजकीय खजिनदान हिसार (पंजाब) च राजे हरसुखलाल यानी धर्मपुरा येथे एक अत्यंत सुंदर असे जैन मंदिर बांधविले. त्या मंदिरातील वेदीसमोरील सिंहयुगलाचे जडाऊ काम आग्राच्या ताजमहालापेक्षा सूक्ष्म व उत्तम असे आहे. सिंहाच्या मिशीचे केस वेगवेगळया दगडांनी अंकित करण्याचे कार्य नि:संदेह अत्युत्तम आहे. राजा हरसुखराम आणि त्यांचे पुत्र सुगनचंद यांनी अनेक ठिकाणी सुमारे ५७ जिनमंदिरे बनविली.

मोहम्मदाच्या सहारनपुर येथील स्थानीय नबाब संध्यान मोहल्यात मशीद बनवीत होता, त्याला अडविले तरी तो ऐकेना हे पाहून त्या मोहल्यातील लोक बादशहाला जाउुन भेटले. लोकांचे म्हणणे ऐकून घेऊन मोहम्मद बादशहानी मशिदीच्या जागी भगवन पार्श्र्वनाथांचे मंदीर सरकारी खर्चाने बांधण्याचा हुकूम दिला. आजही संध्यान मोहल्यातील हे मंदीर प्रेक्षणीय असून बांधकामाच्या दृष्टीने अप्रतिम आहे.

'छत्रसाल' हा बुंदेलखंडातील या काळातला एक जैन राजा होता. तो बलाढय योध्दा असूनही अहिंसा तत्वाचा प्रेमी होता. वयाच्या ९५ व्या वर्षीही, मोहम्मदाने त्याला म्हातारा समजून केलेल्या स्वारीला त्याने शौर्याने तोंड दिले. जैन सम्राट देशसंरक्षणाच्या कामी दुर्लक्ष कसे करणार ! तो आजारी असतानाही दंड ठोकून रणांगणात उडी घेतली व तरुणांना लाजवील अशा असामान्य शौर्याने युध्द केले. मोगल सम्राटाचा सेनापती मुहम्मदखान रणांगणावरुन पळून जाऊ लागला. त्याचा पाठलाग करुन वीर छत्रसालाने त्यास घेरले, 'पुन्हा कधीही तुमच्या राज्यात आक्रमण करणार नाही' असे वचन घेऊनच त्याला संधि करण्यास भाग पाडले.

**अहमदशाह** (१७५४ ते १७५७) अहमदशाहाच्या कारकीर्दीत अनेक जैन मंदिरे बांधण्यात आली. दिल्ली वगैरे अनेक ठिकाणी या काळात रथोत्सव साजरे झाले.

**आलमगिर द्वितीय** (१७५४ ते १७५७) याच्या कारकीर्दीत इराणचा कोटयाधिश व्यापारी सिंध येथे आला होता. तेथे जैन मुनी अभयचंदजी यांची त्याच्याशी भेट झाली. मुनींचे चरित्र व उपदेश यानी प्रभावित होऊन त्याने आपल्या कोटयावधी रुपयाची संपत्ती गोरगरिबांना वाटून तो जैन धर्मानुयायी बनला. जैन शास्त्रांच्या स्वाध्यायामुळे सत्य म्हणजे काय याचे त्यास परिपूर्ण ज्ञान झाले. संपूर्ण संन्यासी वस्तूचा त्याग करुन तो नग्न दिगंबर जैन साधू बनला. आलमगिर बादशहाने त्यास आज्ञा केली की, 'जैनधर्म सोडून तू परत इस्लाम धर्माचा स्वीकार कर नाही तर जिवंतपणीच तुझ्या अंगावरील कातडी सोलली जाईल.' त्याने उत्तर दिले की, 'एक दिवस शरीर नष्ट होणारच आहे. मग त्याचा मोह कशाला, अनादिकाळापासून शरीरामागून शरीरे मिळत आलेलीच आहेत. जन्म-मरण आणि शारीरिक बंधनातून सुटका होऊन मी कधी मुक्त होईन ? असा दिवस केव्हा तरी पहावयास मिळेल या भावनेनी मी जैन धर्माच स्वीकार केला आहे. पवित्र व अविनाशी सुखाच्या साधनाला मी कसे सोडू. आलमगिराच्या रागाचा पारा चढला व जिवंतपणीच त्याची कातडी सोलण्याची त्याने आज्ञा दिली. खाटीक त्याच्या शरीरावरील कातडे सोलीत होता तथापि धन्य तो संयमी की त्याच्या चेह-यावर स्मितहास्य दिसत होते.

अभयचंद्र हे या काळातीलच एक प्रसिध्द जैनाचार्य होते. त्यांच्या वाणीमध्ये अशी काही जादू भरलेली होती की ऐकणारा प्रभावित होऊन सहजगत्या जैन धर्माचा स्वीकार करीत असे. एक यहुदी आपला आत्मा शरीराहून वेगळा आहे हे समजल्यानंतर कोटयावधी रुपयाच्य मालमत्तेचा व सुख साधनांचा त्याग करुन स्वेच्छेने साधु बनला. त्याने आपल्या जीवनाचे बलिदान केले पण जैनधर्म सोडला नाही. अशाप्रकारची अटळ श्रध्दा निर्माण करण्याची ताकद आचार्यांच्या वाणीमध्ये होती. गहन तत्वज्ञानाच प्रसार करुन जैनधर्माचा प्रसार करण्याचे व अटळ श्रध्दा ठेवणारा समाज निर्माण करण्याचे कार्य अभयचंद्रानी केले.

**दक्षिण भारतातील जैनधर्म -**

भगवान ऋषभदेवापासून ते भगवान महावीरापर्यंतच्या चोवीस तीर्थकरांची जन्मभूमी उत्तर हिंदुस्थान असली तरी त्या तीर्थकरांचा विहार दक्षिण भारतातही झालेला होता. दक्षिण भारतात जैनधर्माच्या प्रसाराला निश्चितपणे केव्हापासून सुरुवात झाली, ही गोष्ट स्पष्ट नसली तरी, उपलब्ध ऐतिहासिक साधनानुसार अंतिम श्रुतकेवली भद्रबाहूच्या दक्षिणेतील प्रवेशानंतर दक्षिण भारतात जैनधर्माचा प्रसार झाला असावा असे दिसते.

दक्षिणेतील साहित्य, शिलालेख, दंतकथानुसार चंद्रगुप्त मौर्याच्या काळात उत्तर भारतात बारा वर्षाचा भयंकर दुष्काळ पडल्यामुळे भद्रबाहु श्रुतकेवली आपल्या बारा हजार मुनींच्या संघाबरोबर दक्षिण भारतात आले. चंद्रगुप्त मौर्यही त्यांचेबरोबरच होता. श्रवणबेळगोळ येथे पोहचल्यानंतर भद्रबाहूंना आपला अंत समीप आल्याची जाणीव झाल्याने त्यांनी आपल्या संघाला चोल, पांडय इत्यादींच्या प्रदेशात पुढे जाण्याचा आदेश दिला व स्वत: श्रवणबेळगोळमधील एका डोंगरावर, ज्याला कटवप्र म्हणतात, तेथे राहिले. आपला शिष्य चंद्रगुप्ताबरोबरच त्यांनी तेथे आपला अंतिम कालखंड व्यतीत केला व समाधिपूर्वक शरीराचा त्याग केला. चंद्रगुप्त मौर्य हा जैन होता व तो भद्रबाहुबरोबर दक्षिणेत आला असल्याचे निरनिराळया इतिहास साधनांच्या आधारे, लुईस राईस, महामहोपाध्याय आर. नरसिंहाचार्य, थॉमस, डॉ. फ्टीट, डॉ. स्मिथ इत्यादि विचारवंतानी स्पष्ट केले आहे. सामान्यत: भद्रबाहुबरोबरच दक्षिण भारतात जैन धर्माची सुरुवात मानली जात असली तरी, काही विद्वानांच्या मते दक्षिण भारतात या अगोदरच्या काळापासून जैनधर्म अस्तित्वात होता. आपल्या मताच्या पुष्टयर्थ त्यांनी खालील मुद्दे दिले आहेत.

१) एवढया मोठया संख्येच्या साधूंच्या संघाला दक्षिणेत घेऊन जाण्याच्या अगोदर तेथे आपले यथोचित स्वागत होईल असा विश्वास त्यांना असावा. जैन साधूंचा आहारविधि सोपा नसल्याने तो कोणत्याही अजैन माणसाला करता येणे अशक्य होते. यावरुन कर्नाटक व तामिळनाडूच्या प्रदेशात भद्रबाहूंच्या आगमना अगोदर निश्चितपणे जैन समाज अस्तित्वात असावा.

२) श्रीलंकेचा राजा धंतुसेणच्या कारकीर्दीत लिहिलेल्या बौध्द ग्रंथ महावंशामध्ये इ. स. पू. ५४३ पासून इ. स. ३०१ पर्यंतची माहिती आहे. त्यात अनुराधापुरच्या राजधानीचे वर्णन आहे. त्यात शहरात एक गिरी नावाची इमारत निर्ग्रंथासाठी असून त्यात बरेच निर्ग्रंथ रहात असल्याची माहिती आढळते. राजाने निर्ग्रंथासाठी एक मंदिर बांधल्याचीही माहिती मिळते. यावरुन इ. स. पू. ६ व्या शतकात 'श्रीलंका' मध्ये जैन धर्माचा प्रसार दिसतो. दक्षिण भारताच्या प्रदेशाशिवाय श्रीलंकामध्ये एकदम जैनधर्माचा प्रसार होणे अशक्य आहे.

३) तमिळ प्रदेशात प्राचीनतम ब्राह्मी शिलालेख मदुरा व रामवाड जिल्ह्यात मिळाले आहेत. डॉ. सी. नारायणराव यांच्या मते या शिलालेखाचा संबंध जैन धर्माशी आहे. ज्या ठिकाणी हा शिलालेख मिळाला आहे त्याच्या शेजारीच जैन मंदिराचे भग्नावशेष व जैन तीर्थकारांच्या मूर्ती आढळतात, ज्या मूर्तीवर सापाचा फणा किंवा तीन छत्र आहेत.

यावरुन असे दिसते की, जैन धर्माने इ. स. पू. चौथ्या शतकातच श्रीलंका व तमिळ येथील समाजाच्या सामाजिक व धार्मिक जीवनात प्रभाव पाडलेला होता. कुरळ व तोलकाप्पियम् या प्राचीन तमिळ

ग्रंथात आढळणाऱ्या जैन विचारावरुन विद्वानांचे मत आहे की, वैदिहक धर्माच्या प्रभावाच्या अगोदरच तमिळमध्ये जैन धर्माचा प्रभाव होता. नाळडियार हा किवदंतीच्या मते पांडय राजाच्या इच्छेविरुध्द पांडय देश सोडून जाणाऱ्या आठ हजार जैन मुनींची संयुक्त रचना आहे.

भगवान महावीरांनी स्वत: कलिंग देशामध्ये विहार करुन जैनधर्माचा प्रसार केला होता. त्यामुळे कलिंग जैन धर्माच प्रमुख केंद्र होते. याची माहिती महाराजा खारवेलाच्या हाथीगुंफा शिलालेखावरुनही मिळते.या शिलालेखानुसार इ. स. पूर्व ४२४ च्या सुमारास मगध सम्राट नंदाने कलिंगला जिंकून तेथून जैन मूर्ती मगधाला नेल्या.याच मूर्ती मगधावर स्वारी करुन खारवेलनी परत मिळविल्या. त्यावर स्व. काशीप्रसाद जायस्वाल यांनी लिहिले आहे की, 'जैन धर्माचा प्रवेश कलिंगच्या प्रदेशात शिशुनागवंशीय राजा नंदवर्धनाच्या काळातच झालेला होता. खारवेलाच्या पूर्वीही उदयगिरी पर्वतावर अर्हताची मंदिरे होती' कारण त्यांचा उल्लेख खारवेलाच्या आलेखात आला आहे. यावरुन स्पष्ट होते की, खारवेलाच्या अगोदरपासूनच कित्येक शतके अगोदर या प्रदेशात जैनधर्म, राष्ट्रधर्म म्हणून स्थापन झाला होता. कलिंगला आंध्रची सरहद्द लागूनच असल्याने भगवान महावीरांच्या काळातच कलिंगहून आंध्रमध्ये जैन धर्माचा प्रसार झालेला असावा. तेथून तमिळ प्रदेशात जैन धर्माचा प्रसार झाला. तेथून जैन धर्माचा तमिळ प्रदेशाच्या दक्षिण भागात प्रसार होऊन तो धर्म सिलोनमध्ये पुढील काळात प्रसारीत झाला असावा. या घटना इसवी सन पूर्व पाचव्या किंवा चौथ्या शतकात घडलेल्या असाव्यात.

तमिळमधून इ. स. पू. तिसऱ्या शतकात जैन धर्माचा प्रसार कर्नाटकमध्ये झाला असावा. भद्रबाहूंचा शिष्य परिवार विशाखाचार्यांच्या नेतृत्वाखाली आपल्या गुरुंच्या अंतिम आदेशाप्रमाणे या प्रदेशात धर्म प्रसाराचे कार्य करीत असावा. यावरुन स्पष्ट आहे की, 'भद्रबाहूबरोबरच जैन धर्माचा प्रसार दक्षिणेत झालेला नसावा तर त्यामुळे जैन धर्माच्या प्रचार व प्रसाराला बळ मिळाले व दक्षिण भारत पुढील काळात जैन धर्माचे प्रमुख केंद्र बनले.' या भागातील अनेक राजकर्त्यांनी या धर्माला संरक्षण दिले व जनतेने या धर्माचा स्वीकार केला.

**आंध्र प्रदेशातील जैनधर्म -**

आधुनिक साधनांच्या आधारे हे सर्वमान्य आहे की, 'आंध्र प्रदेशात जैन धर्म मौर्य काळाच्या पूर्वीपासून अस्तित्वात होता. या प्रदेशात बौध्द संस्कृतीचा प्रभाव पडण्याच्या अगोदरपासून येथे जैन धर्म समाजमान्य होता.' अशोकाने अहिंसा तत्वाचा स्वीकार करण्याच्या किंवा युध्द त्यागाची घोषणा करण्याअगोदरच या प्रदेशात जैन धर्माचे तत्वज्ञान रुजले होते असे खारवेलाच्या आलेखावरुन दिसून येते. खारवेलाच्या शिलालेखात दिलेल्या माहितीप्रमाणे नंद राजांनी कलिंगहून जैन मूर्ती नेल्या त्यावरुन तो जैन असावा, तसेच कलिंगमध्येही जैन धर्माला त्यावेळी महत्वाचे स्थान असावे. श्री. पी. बी. देसाई यांनी लिहिले आहे की, 'मार्कण्डेय पुराणाच्या तेलगू अनुवादानुसार आंध्र प्रदेशातील चार क्षत्रियवंश नंदवंशीय होते. नंद कलिंगवर राज्य करीत होते व जैन धर्माचे अनुयायी होते. यावरुनही जैन धर्माची या प्रदेशातील प्राचीनता स्पष्ट होते. या प्रदेशात जैन गुरुंची वस्ती होती. त्यानी जंगले साफ केली व आपली वसतिस्थाने निर्माण केली. प्रारंभी ही वसतिस्थाने छोटया ग्रामाच्या स्वरुपात असून त्यांना पल्ली म्हणत. पुढील काळात जैन धर्माच्या या अनुयायांनी अशी अनेक ग्रामे वसविली व तीच ग्रामे पुढे कसब्यात रुपांतरीत झाली, त्यांनाच वस्ती म्हटले जात होते असे दिसते.

जैन धर्माच्या आंध्रमधील प्रवेशाबरोबर तेथील तेलगू साहित्यावरही त्या धर्माचा प्रभाव पडलेला जाणवतो. तेलगू साहित्यामध्ये तीन चार ग्रंथ असे आहेत की, ज्यांना जैन कलाकृती मानले जाते. सर्वात प्राचीन ग्रंथ म्हणजे नन्नय भट्टाचा महाभारत होय. हा ग्रंथ पूर्वीय चालुक्य राजा राजराज द्वितीय यांच्य आश्रयामुळे ११ व्या शतकाच्या मध्यामध्ये रचला गेला असावा. राजराज द्वितीयच्या काळात आंध्र प्रदेशात हिंदुधर्माच्या प्रसाराची मोठी लाट उसळली. त्यामुळे जैन धर्माचे पतन झाले. नन्नय भट्टाचा महाभारत जैन ग्रंथ नसला तरी नन्नयन चम्पू काव्याची शैली अवलंबिलेली दिसते, तसेच कन्नड जैन कवींचा अविष्कार या

ग्रंथावरही आढळतो. यावरुन इ. स. ९ वे व १० वे शतकात या प्रदेशातील साहित्यावर जैन धर्माचा प्रभाव आढळतो.

आंध्र प्रदेशात मिळालेली उत्खलित साधने व इतर अनेक भग्न अवशेष तेथील जैन धर्माचे प्राचीनत्व सिध्द करतात. कुडुपह (cuddapah) जिल्ह्यातील दानवुलपाडु (Danavulapadu) हे जैन धर्माचे एक महत्वाचे केंद्र होते. सन १९०३ मध्ये तेथे भारत सरकारच्या पुरातत्व विभागाने उत्खनन केले. उत्खननात सापडलेल्या एका स्तंभावर जैन तीर्थकर व जैन शासन देवतांच्या मूर्ती आढळल्या. त्यातील काही मूर्तीवर आठव्या किंवा नवव्या शतकातील लेखही आढळतात. येथे उत्खननात एक विटानी बांधलेली खोली मिळाली, ज्यात पार्श्वनाथ तीर्थकारांची मूर्ती आढळली. खोलीच्या विटाही मोठया आकाराच्या असून, त्या कृष्णा जिल्ह्यातील विटांच्या प्रमाणाशी मिळत्या-जुळत्या आहेत. आंध्र प्रदेशातील काही नाणीही या उत्खननात मिळाली. उपलब्ध वस्तूवरुन हे स्थान कमितकमी तिसऱ्या शतकापासून जैन धर्माचे प्रमुख केंद्र असावे.

गंजम जिल्हा सध्या ओरिसात आहे. पूर्वीपासूनच हा जिल्हा आंध्र प्रदेशाचा उत्तरीय सीमांत प्रदेश होय. या जिल्ह्यातील शैलाद नावाच्या ठिकाणी डोंगरावर एका गुंफेत जैन तीर्थकरांच्या मूर्ती आढळल्या आहेत. गुंफेच्या बाहेर भगवान महावीरांची मूर्ती आहे. जयति नावाच्या ठिकाणी दोन लहान जैन मंदिरांचे अवशेष मिळाले आहेत. मामिडीवाड, येथेही दोन जैन मंदिरे आढळतात. माचवरम् गावाच्या पश्चिमेस असलेल्या तलावाच्या काठावर दोन जैन मूर्ती आहेत. टाटिपाक, पोट्टगी, नंदपुरम् इत्यादी गावामधूनही छोटी मंदिरे व मूर्ती आढळून येतात. विजगापट्टम् जिल्ह्यातील धर्मवरम् नावाच्या ठिकाणी कायोत्सर्ग मुद्रेतील एक सहा फूट उंचीची मूर्ती जमिनीत अर्धा भाग गाडलेल्या अवस्थेत आढळते. या मूर्तीला 'संन्यासी अय्या' म्हणतात. संतानेच्छू स्त्रिया या मूर्तीची पूजा करतात. गोदावरी जिल्ह्यातील अरियक्तम्, नेडुलूरु, आत्रेयपुरम्, कजलूरु, जन्नूरु, द्राक्षाराम इत्यादी गावांमध्ये जैन मूर्ती व मंदिरे आढळतात. नेल्लोर जिल्ह्यातील आत्मकुरु कसब्याच्या पश्चिमेस एका पहाडावर एक तीर्थकराची प्रतिमा आढळते. कर्नूल जिल्ह्यातील याचवरम् व नायकल्लू या गावामध्ये जैन धर्माचे अवशेष मिळतात.

आंध्र प्रदेशातील जैन धर्माच्या प्रसाराची माहिती मिळविण्यास हाथीगुंफा येथील महाराजा खारवेलाचा शिलालेखही उपयुक्त आहे. खारवेल जैनधर्माचा महान् अनुयायी होता. इसवी सनपूर्व पहिल्या शतकातील या शिलालेखात जैन धर्माच्या प्रसारार्थ खारवेलाने केलेल्या कार्याची माहिती दिलेली आहे. या शिलालेखावरुन स्पष्ट आहे की, कलिंगच्या दक्षिण भागात जैन धर्माचा प्रसार पूर्वीपासूनच होता व हा प्रदेश आंध्रच्या उत्तर सीमेला जोडणारा आहे. आंध्रमधील इ. स. पू. ६ व्या शतकापासून ते इ. स. पू. २ ऱ्या शतकापर्यंत जैन धर्माच्या स्थितीची काहीही निश्चित माहिती मिळत नाही. तथापि अनुमान करणे शक्य आहे की, महाराजा खारवेल

जैन धर्माचा संरक्षक असल्याने, या काळात आंध्रमध्ये जैनधर्म प्रसाराला चालना मिळाली असावी. त्याच्या सहकार्याने व प्रेरणेने जैन धर्म प्रसारकांनी आंध्रमध्ये निरनिराळया ठिकाणी जाऊन जैनधर्म प्रसाराचे कार्य केले असावे. कारण याच शिलालेखात खारवेलानी कुमारी पर्वतावर जैन गुरुंचे सम्मेलन भरविल्याची माहिती मिळते. यावेळीही सरहद्दीजवळच्या प्रदेशात धर्म प्रसाराचे प्रोत्साहन प्रचारकाना मिळाले असावे. या शिलालेखाच्या आधारावरुन आंध्र प्रदेशात कलिंग देशातूनच जैन धर्माचा प्रसार झालेला असावा असे दिसते.

यानंतरच्या काळातील आंध्रमधील जैन धर्माच्या प्रसाराचे चित्र फारसे सुस्पष्ट होत नाही, कारण आंध्रमध्ये या नंतरच्या काळात धार्मिक व राजकीय जीवनात मोठया प्रमाणात परिवर्तन झालेले दिसते.

सातवाहन घराण्यातील राजानी इ.स.पू. तिसऱ्या शतकापासून ते इ. स. तिसऱ्या शतकापर्यंत आंध्रच्या काही भागावर राज्य केले. सातवाहन राजे बौध्द धर्माचेच उपासक होते. यानंतर सत्तेवर आलेल्या

पल्लव राज्यांनी हिंदु धर्माला नुसता राजाश्रयच दिला नाही, तर या धर्माच्या प्रसाराचे विविध प्रयत्न केले. अशाप्रकारे इ. सनाच्या सातव्या-आठव्या शतकापर्यंत जैन धर्माला राजा किंवा त्यांच्या अधिकाऱ्याकडून कोणतेही सहकार्य मिळाले नाही. या काळातही आंध्र प्रदेशात काही ठिकाणी आजीवकांची संख्या लक्षात घेण्याजोगी होतीच. जैन धर्म प्रसाराचे त्यांचे कार्य थोडया प्रमाणात चालूच होते. कर्नाटकामध्ये चालुक्य घराण्याची स्थापना झाल्यानंतर, त्यांच्या जैन धर्माच्या राजाश्रयामुळे आंध्र प्रदेशातही काही प्रमाणात जैनधर्म प्रगतीला सुरुवात झालेली दिसते.

पूर्वीय चालुक्य वंशाच्या राजांनी जैन धर्माला प्रथमपासूनच संरक्षण दिले. पश्चिमीय चालुक्यवंशीय राजा पुलकेशी दुसरा याचा लहान बंधु विष्णुवर्धन याने सातव्या शतकाच्या प्रथम चरणामध्ये आंध्र प्रदेशात आपल्या वंशाची स्थापना केली. कुवज विष्णुवर्धनाची राणी अय्यण महादेवीने वैजवाडाच्या नदुम्बी वस्ती नावाच्या जैन धर्माला आपला प्रभाव व शक्ति संगठित करता आली. या वंशाचा एक शासक विजयादित्य सहावा उपनाम अम्म द्वितीय, हा जैन धर्माचा उदार आश्रयदाता होता. त्याने इ. स. ९७० पर्यंत राज्य केले. त्याचे तीन ताम्रपट प्रकाशित आहेत. त्यात जिन मंदिराला केलेल्या दानाची माहिती दिली आहे. या राजाने दिलेल्या यलिमपुंडी आज्ञापत्रानुसार, कटकराज दुर्गराजानी धरमपुरी गावाच्या दक्षिणेला एक जैन मंदिर बांधल्याची माहिती मिळते. दुर्गराज हा राज्यातील एक प्रमुख अधिकारी होता. कटकराज या त्याच्या पदवीवरुन तो राजकीय हालचालींचा प्रमुख असावा असे दिसते. या मंदिराचे नावही कटकाभरण जिनानंद ठेवण्यात आले. दुर्गराजाच्या प्रार्थनुनुसार राजाने या मंदिरासाठी मलिमपुंड हे गावही दान दिले. जिनालय मायनिय संघ, मंडुकगण, नंदीगच्छच्या जिननंदीचे प्रशिष्य, तसेच दिवाकर सेनाचे शिष्य मंदिराच्या देखरेखीचे काम पहात असल्याची माहिती मिळते.

कलुचुम्बुरु ताम्रपटात सर्व लोकाश्रय जिनभवन नावाच्या मंदिराच्या संबंधित भोजन गृहाच्या व्यवस्थेसाठी कलुचुम्बुरु गाव दान दिल्याची माहिती आढळते. याच राजाच्या मछलीपट्टमच्या दानपत्रात जैनधर्म विषयक उत्कृष्ट माहिती आहे. त्यात जैन धर्माचा उपासक असलेल्या एका मांडलिक कुटुंबाच्या व गुरुच्या परंपरेचा उल्लेख दिलेला आहे. ग्रेव्यगोत्र व त्रिनयन कुळाचा वंशज नरवाहन प्रथम, पूर्वीय चालुक्य राजाचा मोठा अधिकारी होता. त्याचा पुत्र मेलपराज व सून मेंडाम्बा जैन धर्माचे उत्साही अनुयायी होते. मेलपराजाचे पुत्र क्षपणक, क्षुल्लिका इत्यादींचे सम्मान भीम व नरवाहन द्वितीय यांचेकडून होत असे. गुरुंच्या व आचार्यांच्या प्रेरणेमुळेच त्यांनी वैजवाड येथे दोन जैन मंदिरे बांधली. या मंदिराला राजा अम्म द्वितीय याने पेडु गाडिदिपर्रु नावाचे गाव दान केल्यची माहिती मिळते.

पान नं. १२९ वरुन-

मारसिंहाची परोपकारिता केवळ अनेक ठिकाणी जिनालयांच्या निर्मितीपर्यंतच मर्यादित नाही तर, त्यांनी अनेक विद्वानाना सहकार्य केले. विद्वानामध्ये व्याकरणकार, प्रसिध्द तत्वज्ञ व कवींचा समावेश होता. मारसिंहाचा पुत्र राचमल्ल चतुर्थ यानी श्रवणबेळगोळ निवासी अनंतवीर्यला पेग्गदूर नावाच्या गावाचे व इतरही काही दान दिल्याची माहिती मिळते. मारसिंह व त्याचा पुत्र राचमल्ल चतुर्थ यांचा मंत्री व सेनापती प्रसिध्द चामुंडराय हा होता, राचमल्ल चतुर्थच्या कारकिर्दीतच सेनापती चामुंडरायनी श्रवणबेळगोळ या पवित्र स्थानी गोमटेश्वर बाहुबलीच्या उत्तुंगमूर्तीची स्थापना केली. मारसिंहाप्रमाणे चामूंडरायही अजितसेन भट्टारकाचा शिष्य होता. गोम्मटसारादी ग्रंथाचे कर्ते नेमिचंद्र हे त्यांचे दुसरे गुरु होते. कानडीतील महाकवी रन्न चामुंडरायाच्या दरबारातच प्रसिध्दिला आला. चामुंडराय स्वतः कुशल लेखक होता.

गंग घराण्यातला शेवटचा प्रमुख राजा रक्कस गंग पेमनिडि राचमल्ल पंचम होय. ९८४ इ. स. मध्ये हा राज्यसिंहासनावर बसला व त्याने पतनोन्मुख गंग राज्याला वाचविण्याचे व्यर्थ प्रयत्न केले. त्याचे गुरु द्रविड संघाचे विजयदेव भट्टारक हे होते. इ. स. १०२५ मध्ये या घराण्याच्या राजसत्तेचा अंत झाला असला, तरी छोटया छोटया प्रमाणात या घराण्याचे अस्तित्व बराच काळ होते.

गंग वंशातील राजे प्रथमपासूनच जैन धर्माचे उपसक व संरक्षक होते. आपल्या उदारतेबरोबरच ते अन्य धर्मानाही संरक्षण प्रदान करीत होते. परधर्मसहिष्णुता हे त्यांचे वैशिष्ठय होय. या वंशातील निरनिराळया सत्ताधिशांनी स्वतः जैन धर्माचे पालन केलेच, त्याचबरोबर जैन धर्माला राजधर्माचे स्थान दिले. त्यामुळेच या काळात कर्नाटकच्या प्रदेशात जेन धर्माला एक प्रभावी धर्माचे स्वरुप प्राप्त झाले. जैन साहित्य, कला इत्यादी विविध क्षेत्रात असामान्य प्रगति झाली. म्हणूनच 'गंग राजसत्तेचा काळ हा जैन धर्माचा सुवर्ण युगाचा काळखंड' मानला जातो.

**गंग काळातील साहित्य**

गंग राजानी जैन धर्माला दिलेल्या आश्रयामुळे या काळात जैन धर्माचे साहित्यही मोठया प्रमाणात निर्माण झाले.

जैन तर्कशास्त्रावरील लेखकामध्ये अकलंकदेवानंतर विद्यानंदीचे स्थान महत्वाचे आहे. 'आत्मपरीक्षा' हा आपला ग्रंथ त्यांनी सत्यवक्य (राजमल्ल द्वितीय) राजाकरिता लिहिला. यावरुन हा ग्रंथ नवव्या शतकात लिहिला गेला हे निश्चित होते. 'तत्वार्थश्लोकवार्तिक' हा त्यांचा प्रसिध्द ग्रंथ असून तत्वार्थसूत्रावर लिहिलेली ही श्लोकबध्द टीका आहे. वार्तिकाच्या पध्दतीला अनुसरुन या श्लोकांचे विवरणही स्वतः आचार्यानीच दिले आहे. यातील अर्धा अधिक भाग पहिल्या अध्यायाच्या विवरणाला दिलेला असून, त्यात जीव तत्वाच्या स्वरुपाविषयी असलेल्या वादविवादांचे उत्तम परीक्षण केले आहे. विशेषतः बोध्द तत्वज्ञानाचे खंडन करण्याची दृष्टि यात प्रमुख आहे. 'अष्टसहस्त्री' हा विद्यानंदीचा दुसरा ग्रंथ समंतभद्रांच्या आत्ममीमांसेवर अकलंकदेव यांनी अष्टशती टीका लिहिली होती. तिचे विवरण या अष्टसहस्त्रीत समाविष्ट होते. कारण यात प्रायः सर्व जैनेतर मतांचे समालोचन जैन दृष्टीने केले आहे. आत्मपरीक्षा या ग्रंथात 'मोक्षमार्गस्थनेतारं' इत्यादी मंगलाचरणाचा आधार घेऊन धर्ममार्गाचा उपदेशक पुरुष कसा असतो ते तर्कशास्त्रदृष्टया दर्शविले आहे. जैनेतर तत्वज्ञांच्या ईश्वरविषयक कल्पनांचे खंडन हा या ग्रंथाचा मुख्य उद्देश्य आहे. याशिवाय पत्रपरिक्षा, सत्यशासनपरीक्षा, संमतभद्राच्या युक्तयुशासनावरील टीका श्रीपुरपार्श्वनाथस्तोत्र, विद्यानंदमहोदय इत्यादी त्यांचे ग्रंथ प्रसिध्द आहेत.



देशीय गणाचे आचार्य अभयनंदी यांचे शिष्य आचार्य वीरनंदी होत. दहाव्या शतकाच्या पूर्वार्धात त्यांनी 'चंद्रप्रभचरित' या संस्कृत महाकाव्याची रचना केली. आठवे तीर्थकर चंद्रप्रभ यांचे चरित्र पूर्वजन्मासह यात सांगितले आहे. याची शैली सोपी व लालित्यपूर्ण आहे. यानी दुसऱ्या सर्गात जीवतत्वाविषयी बरीच तार्किक चर्चा केली असून शेवटच्या सर्गात समग्र जैन सिध्दांताचे संक्षिप्त वर्णन आहे. 'श्रुतावतार' हा आचार्य इंद्रनंदीचा प्रसिध्द ऐतिहासिक ग्रंथ आहे. षट्खंडागम व कसायपाहुड या दिगंबर संप्रदायात प्रसिध्द असलेल्या आगम ग्रंथाची पूर्वपरंपरा शतकाच्या पूर्वाधातील आहे. आचार्य कनकनंदी हे आचार्य इंद्रनंदीचे शिष्य होते. गोमटसारातील सत्वस्थान प्रकरणाचा उपदेश आचार्य नेमिचंद्रानी यांच्यापासूनच प्राप्त केला होता. यांचा स्वतंत्र ग्रंथ उपलब्ध नाही.

कर्मशास्त्रावरील या काळातील लेखकामध्ये नेमिचंद्राचे स्थान महत्वपूर्ण आहे. गंगराज राजमल्ल (चतुर्थ) यांचा सेनापती चामुंडराय यांच्याकरिता यांनी 'गोमटसार' या ग्रंथाची रचना केली. जीवकांड व कर्मकांड असे या ग्रंथाचे मुख्य दोन विभाग आहेत. प्राचीन सिध्दांत ग्रंथावरील धवला व जयधवला या टीकामध्ये अनेक प्राचीन प्राकृत गाथा उध्दृत केल्या होत्या. या गाथांची व्यवस्थित रचना करुन हा ग्रंथ संकलित केला आहे म्हणूनच त्यास गोमट संग्रहसूत्र असे दुसरे नाव आहे. लब्धिसार व क्षपणासार हे ग्रंथ गोमटसाराच्या परिशिष्टाच्या स्वरुपात आहेत. 'त्रिलोकसार' या ग्रंथात त्यांनी त्रिलोकप्रज्ञप्ति या प्राचीन ग्रंथाच्या आधारे भूगोलविषयक जैनांनी केलेले विवरण व्यवस्थितपणे मांडले आहे. या काळातील आचार्य माधवचंद्र हे नेमिचंद्रांचे शिष्य असून, त्रिलोकसाराच्या मूळ पाठाला अधिक व्यवस्थित रुप देण्यात यांनी

सहाय्य केले होते. चामुंडरायाचा चामुंडरायपुराण हा कन्नड ग्रंथ महापुराणाच्या आधारावर लिहिलेला आहे. सन ९७८ मध्ये त्यांनी याची रचना पूर्ण केली. ६३ शलाका पुरुषाच्या कथा यात ग्रथित केलेल्या आहेत. चरित्रसार हा संस्कृत ग्रंथही चामुंडरायची दुसरी कृति होय. गृहस्थ व मुनि यांच्या आचारधर्माविषयीच्या प्राचीन विचारांचा उत्तम संक्षेप यात केला आहे. गोमटसाराची देशी वृत्ती ही चामुंडरायांची तिसरी रचना होय. तथापि ती उपलब्ध नाही. चामुंडरायांच्या आश्रयाला असलेल्या कन्नड कवीमध्ये नागवर्मा यांचे स्थान महत्वाचे आहे. हा अजितसेनाचा शिष्य होता. आपल्य पत्नीकरिता याने छंदोवृध्दि हा ग्रंथ लिहिला. यात कानडी वृत्तांचे उत्तम विवरण दिलेले आहे. बाणभट्टाच्या कादंबरीचे याने कानडीत रुपांतर केले आहे. याशिवय चामुंडरायांच्या आश्रयास असलेल्या राजकवींी साहित्यरचनाही या काळातील अनमोल देणगी आहे.

**कदंब वंश -**

कदंब वंशातील काही सत्ताधीश जैन धर्माचे उपासक होते. त्यांच्या सहकार्यानेच जैन धर्माचा या काळात अभ्युदय झाला. चौथ्या शतकाच्या शेवटी या घराण्यात काकत्स्थवर्मा नावाचा प्रसिध्द राजा होता. त्याने जैन धर्माचा स्वीकार केला असून त्याने श्रुतकीर्ती नावाच्या आपल्या सेनापतीला दिलेल्या दानपत्रात, जिनेंद्रची स्तुती केली आहे व शेवटी वृषभ देवांना नमस्कार केला आहे. कदंब राजे ब्राह्मण धर्माचे पुरस्कर्ते असले तरी, त्यानी स्वीकारलेल्या परधर्मसहिष्णुतेच्या धोरणामुळे या काळात जैनधर्माची प्रगति झाली. पाचव्या शतकात राज्य करणाऱ्या मृगेशवर्मा नावाच्या राजानी आपल्या कारकिर्दीच्या तिसऱ्या वर्षी राजधानी वैजयंती येथून काढलेल्या ताम्रपटात म्हटले आहे की, ताम्रपटानुसार, मृगेशवर्माने आपल्या कारकीदीच्या आठव्या वर्षी आपल्या स्वर्गीय पित्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ पलासिका नगरीत एक जिनालय बांधले व त्या मंदिराच्या खर्चासाठी भूमि दान दिली. हे दान कूर्चक संप्रदायाच्या नग्न साधूसाठी दिल्याची माहिती मिळते. मृगेशवर्माचा उत्तराधिकारी राज रविवर्माने आपल्या पित्याचेच अनुकरण केले व जैनधर्माच्या वाढत्या प्रभावाला अधिक

पानं नं. १३१ -

बलवान बनविले. त्याच्या एका ताम्रपटावरुन जैन धर्मासाठी त्याने एक कायदा बनविल्याची माहिती मिळते. त्यात लिहिले आहे की, 'पलासिका राजधानीत राजा रविवर्मानी हा नियम घोषित केला होता की, 'राजा मृगेशवर्माकडून दामकिर्तीच्या मातेला दिलेल्या पुरुखटेक गावाच्या उत्पन्नातून दरवर्षी पूर्णिमेपर्यंत अष्टान्हिक महोत्सव साजरा होणे आवश्यक आहे. वर्षा ऋतूच्या चार महिन्यात साधूंची सेवा व्हावी. ज्यांनी तपस्या केली, ज्यांचा संप्रदाय त्यांच्या सत्कर्माचा साक्षीदार आहे, अशा विद्वानांची सेवा व्हावी व जनपदातील सर्व निवासी, नरनारींनी सदैव जिनेंद्र देवची पूजा करावी,' रविवर्मानी व्यक्तिगत जैनधर्माचा स्वीकार केलेला होता, त्यामुळेच जैनधर्माचा समाजामध्येही प्रभाव प्रस्थापित झाला. त्यामुळे संबंध समाज जैनधर्मविचारानी प्रभावित झ ााला, इतकेच नव्हे तर या काळात अनेक जैन मंदिरे बांधण्यात आली.

रविवर्माप्रमाणेच त्याचा बन्धु भानुवर्मा हाही जैनधर्माचा उपासक होता. एका दानपत्रात पूर्णमासीच्या विदशी जिनदेवाला अभिषेक करण्याच्या निमित्ताने त्याने जैनांना भूमिदान केल्याची माहिती मिळते. रविवर्माचा पुत्र हरिवर्मा याने आपल्या कारकिर्दीच्या चतुर्थ वर्षामध्ये दिलेल्या दानपत्रात राजा मृगेशने निर्माण केलेल्या जिनालयात वार्षिक आष्टान्हिक पूजेच्या वेळी घृताभिषेक करावा व उरलेल्या रकमेतून समस्त सांप्रदायिकांना भोजन द्यावे अशी आज्ञा दिलेली दिसते. कदंब घराण्याचा अंतिम शासक देववर्मा होता. या राजाने युवराज अवस्थेत जैन चैत्यालयाला भूमिदान केली होती. कदंब घराण्याच्या इतिहासाकडे पाहिल्यास कदंब राजानी ब्राह्मण धर्माचा स्वीकार केलेला असला तरी, कोणत्याही काळात व कोणत्याही प्रकाराने परधर्मसहिष्णुततेचे धोरण सोडले नाही, असे दिसते.

राष्ट्रकूट वंश-

गंगराजा शिवमार द्वितीयच्या काळातच राष्ट्रकूटांनी गंगवाडीवर आक्रमण करुन या प्रदेशावर आपल्या घराण्याची सत्ता स्थापन केली. त्याचबरोबर राष्ट्रकूट राजांनी गंग राजाची जैनधर्माला सहाय्यता देण्याची परंपराही कायम ठेवली. काही राष्ट्रकूट राजांनी जैनधर्माला राजाश्रय दिला व या धर्माच्या प्रसाराला सर्वांगीण मदत केली. त्यामुळेच राष्ट्रकूट राजाचा काळ हा जैन धर्माच्या समृध्दिचा काळखंड मानला जातो. या काळात जैन धर्माचा दक्षिण भारतात मोठया प्रमाणात विस्तार झाला. राष्ट्रकूटांच्या पतनानंतरच हिंदु धर्मातील लिंगायत वगैरे पंथाचा मोठया प्रमाणात विस्तार झाला. त्यामुळे यानंतरच्या काही काळ जैनधर्माला पिछेहाट सहन करणे भाग पडले. राष्ट्रकूट काळात जैनधर्माला कोणताही विरोधी संप्रदाय नसल्याने जैनधर्म राज्य-धर्म किंव बहुजन समाजाचा धर्म म्हणून मान्यवर झालेला होता. या काळात जैनाचार्यानी जैन साहित्यची मोठया प्रमाणात अभिवृध्दी केली. इतकेच नव्हे तर सामान्य लोकांना शिक्षण देण्याच्या कार्यातही जैन समाजाने पुढाकार घेतलेला होता. वर्णमाला शिकण्याच्या अगोदर वैदिक संप्रदायाप्रमाणे जसे विद्यार्थ्याला श्री गणेशायनमः शिकविले जाते. तसे दक्षिण भारतात अजूनही मोठया प्रमाणात 'ओम् नमः सिध्देभ्यः' असा जैन नमस्कार करण्याची प्रथा आढळते. यावरुन श्री. चि. वि. वैद्य यांच्या मते दक्षिण भारतात जैन गुरुनी शिक्षण पध्दतीत पूर्णपणे भाग घेऊन आपला अशा प्रकारच प्रभाव निर्माण केला होता की, 'जैनधर्माचा दक्षिण भारतात विनाश झाल्यानंतरही वैदिक संप्रदायीही आपल्य मुलांना अजून जैन नमस्कार वाक्य शिकवितात.'

राष्ट्रकूट राजसत्तेच्या अगोदरच्या राजकाळातच जैनधर्माचा प्रसार झालेल होता. कदंब वंशाचे राजे जैनधर्माचे अनुयायी व अभिवर्धक होते. इ. स. १० व्या व ११ व्या शतकातील शिलालेखात विनयादित्य व



विक्रमादित्य इत्यादी चालुक्य राजांनी जैनधर्माला मदत केल्याची माहिती मिळते. तलवाडच्या गंग राजघराण्यापैकी अधिकांश राजे जैन धर्मानुयायी व अभिरक्षक होते. या निरनिराळया राजांनी बांधलेली चैत्यालये त्यांच्या नावाने आजही ओळखली जातात. महाराजा मारसेन द्वितीय तर परम जैन भक्त होते. आचार्य अजितसेन हे त्यांचे गुरु होते. जैन धर्मावर त्याची प्रगाढ श्रध्दा होती की, ९७४ मध्ये त्यांनी राज्यत्याग करुन समाधिमरणपूर्वक प्राण विसर्जन केले. मारसिंहाचा मंत्री चामुंडराय प्रबळ प्रतापी सेनापती होता. श्रवणबेळगोळ येथे लोकोत्तर विशाल व सर्वांगपरिपूर्ण मूर्तीची स्थापना त्यानी करविली होती. जैनधर्माविषयीची आस्था व प्रसाराच्या कार्यामुळेच चामुंडरायाचा समावेश जैनधर्माच्या तीन महत्वाच्या प्रचारकामध्ये करण्यात येतो.

राष्ट्रकूटांनी दक्षिणेतील विशाल व प्रबळ राज्याची परंपरा पुढे चालविली. चालुक्यांच्या साम्राज्याचा सर्व प्रदेश त्यांच्या ताब्यात होताच. शिवाय उत्तरेला कनोजपर्यंत व दक्षिणेला रामेश्वरपर्यंत वेळोवेळी त्यांनी स्वाऱ्या केल्या होत्या. कुलपरंपरेचे राष्ट्रकूट राजे कृपण व शिवाचे उपासक असले तरी, जैनधर्माविषयी सहानुभूतीचे धोरण त्यांनी स्विकारलेले होते. राजा अमोघवर्षानी तर जैनधर्माचा स्वीकार केलेला होता, म्हणूनच जैनधर्माच्या इतिहासात या घराण्याच्या इतिहासाला महत्वाचे स्थान आहे. राष्ट्रकूट वंशाचे प्रारंभीचे राजे दंतिदुर्ग, कृष्ण, गोविंद व ध्रुव यांच्यावेळचे जैनांचे शिलालेख उपलब्ध नाहीत. ध्रुवाचा पुत्र गोविंद (तृतीय) उर्फ जयतुंग प्रभूतवर्ष (९७३-८१४) याच्या वेळची दोन मानपत्रे मिळाली आहेत. त्यातील पहिले ८०२ मधील प्रभाचंद्र आचार्यांना दिलेले असून, त्यात मान्यपूर (कर्नाटक) नगराजवळ असलेल्या एका जिनमंदिराला एक गाव दान दिल्याची माहिती आहे. दुसरे दानपत्र ८१२ मध्ये दिलेले असून, त्यात थापनीय संघाचे आचार्य अर्ककिर्ती यांना एक गाव दिल्यचा उल्लेख ओ. वीरसेन आचार्यांनी 'धवला टीका' सम्राट जगत्तुंगाच्या राज्यकाळातच लिहिली आहे. जगत्तुंगाचा बंधु कंब याने दिलेले एक ताम्रपट चामराजनगर येथे मिळाला आहे. त्यात आचार्य वर्धमान यांना एक गाव सन ८०७ मध्ये दान दिल्याचा उल्लेख आहे.

गोविंद जगत्तुंगच्या मृत्युनंतर त्याचा पुत्र अमोघवर्ष सन ८१४ च्या सुमाराला गादीवर आला. शर्व, नृपत्तुंग, अतिशयधवल, पृथ्वीवल्लभ अशी बिरुदे त्याला लावलेली दिसतात. राज्यारोहणाच्यावेळी अमोघवर्ष केवळ १४ वर्षाचा होता. त्यामुळे राष्ट्रकूट साम्राज्यातील अनेक मांडलिक राजांनी त्याचे वर्चस्व झुगारुन स्वतंत्र

होण्याचा प्रयत्न केला. पंरतु या संकटाच्या वेळी गुजरामधील कर्कराज याने अमोघवर्षाला मोठी मदत केली. त्यामुळे सन ८२१ पर्यंत पुन्हा पूर्वीच्या सर्व साम्राज्यावर त्याचा अधिकार स्थापन झाला. यानंतरही अमोघवर्षाच्या राज्यकाळात त्याला स्वस्थता लाभली नाही. पूर्व किनाऱ्यावरील चालुक्य राजा विजयादित्य याला ताब्यात ठेवण्याकरता त्याला कित्येकदा युध्द करावे लागले. दक्षिण सीमेवरील गंग राजानीही जवळ जवळ वीस वर्षे त्याच्याबरोबर युध्द केले. शेवटी राजपुत्र नुतुंग याला आपली कन्या देऊन अमोघवर्षाने हा कलह थांबविला. ओरिसाच्या सीमेवरील राज देवपाल याच्याशी झालेल्या युध्दातही कोणत्याच पक्षाला पूर्ण विजय मिळाला नाही. गुजरातमधील राष्ट्रकूटांचा प्रमुख कर्कराज याचा सन ८३० मध्ये मृत्यू झाल्यावर त्याचा पुत्र ध्रुव यानेही बंड केले. हा संघर्षही सुमारे ३० वर्षे चालला. शेवटी सन ८६० मध्ये ध्रुव (द्वितीय) हा राज्यारुढ झाल्यावर हा संघर्ष मिटला. अमोघवर्षाचे ६४ वर्षाचे राजकीय जीवन सतत संघर्षमय अवस्थेत गेले. असे असतानाही त्याच्या उदार व विद्याभिलाषि स्वभावामुळे दक्षिण भारताच्या इतिहासात त्याला मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्याने स्वतः 'कविराजमार्ग' हा काव्यशास्त्रावरील कानडी ग्रंथ रचला व 'प्रश्नोत्तरमालिका' या सुबोध संस्कृत कवितेची रचना केली. आचार्य जिनसेनांनी 'पार्श्वाभ्युदय' काव्यात स्वतःला या राजाचा गुरु म्हटले आहे. आपल्या गुरुंच्या नामस्मरणांनी तो स्वतःला पवित्र मानीत असे. आदिपुराण ग्रंथाच्या शेवटच्या पाच अध्यायाची रचना करणाऱ्या गुणभद्रचार्यांना अमोघवर्षानी आपला मुलगा कृष्ण द्वितीय याचा शिक्षक म्हणून नेमले होते. अमोघवर्षानी वृध्दावस्थेत असताना आपल्या राज्याचा त्याग करुन धर्माचरणात काळ घालविला.

पान नं. १३३ वरुन -

याच्या कारकीर्दीत जिनसेन गुणभद्र, महावीर व शाकहायन या चार प्रसिध्द आचार्यांनी जैन साहित्यात मोलाची भर घातली.

अमोघवर्षाची जैनधर्माच्या स्वीकाराची परंपरा त्याच्या वंशजांनी पुढे चालविली नाही. ते शिव व विष्णूचे उपासक बनले. तथापि जैन संघातील विद्वान आचार्यांना मात्र त्यांनी उत्कृष्ट आश्रय दिला. अमोघवर्षाचा पुत्र कृष्ण (द्वितीय) अकालवर्ष (८७८-९१४) याच्या कारकिर्दीत गुणभद्र आचार्यांनी उत्तरपुराण पूर्ण केले. अकालवर्षाचा सामंत लोकादित्य यांच्या बंकापुर नामक राजधानीत ही रचना पूर्ण झाली. सौदत्ती येथील सामंत पृथ्वीराज याने तेथील स्वनिर्मित जिनमंदिराला अकालवर्षाच्या कारकिर्दीतच काही भूमि दान दिली. त्यात कारेय गणाच्या इंद्रकिर्ति स्वामीचा गुरु म्हणुन उल्लेख आहे. अकालवर्षाचा आणखी एक सामंत नागार्जुन याच्या मृत्युनंतर त्याची पत्नी जक्कियब्बे हिला त्या प्रदेशाचे अधिकार देण्यात आले. तिने जक्कली येथील जिनमंदिराल काही भूमि दान दिली होती. तिचे समाधिकरण सन ९१८ मध्ये झाले. मुलगुंड येथील जैन मंदिराला कृष्ण द्वितीयनी दान दिले होते. यावरुन तो जैनधर्मीय नसला तरी जैन धर्माचा आश्रयदाता होता असे दिसते.

अकालवर्षानंतरचा प्रमुख राष्ट्रकूट सम्राट कृष्ण (तृतीय) (इ. स. ९३९-९६६) हा होय. याचे साम्राज्य उत्तरेला माळव्यापर्यंत व दक्षिणेला रामेश्वरपर्यंत पसरलेले होते. जैन साहित्याच्या दृष्टिने याचा काळ अमोघवर्षाच्या काळाइतकाच संस्मरणीय ठरला. सोमदेव, पुष्पदंत व इंद्रनंदि हे संस्कृत-प्राकृतचे व पंप, पोन्न हे कानडीचे विख्यात लेखक याच काळात होऊन गेले. आचार्य सोमदेव यांना कृष्ण राजाचा सामंत अरिकेसरी याने एक गव सन ९५९ मध्ये दान दिला होता. महकवि पंप हा अरिकेसरीचाच सभापंडित होता. पुष्पदंतचे आश्रयदाते भरत व वन्न हे कृष्णराजाचे मंत्री होते. पोन्न कवीला कृष्णराजानी 'उभयभाषा चक्रवर्ती' ही पदवी दिली होती. गंगराज मारसिंह हा कृष्णराजाचा प्रमुख जैन मांडलिक होता. नर्मदेच्या उत्तरेल कृष्ण राजानी ज्या स्वाऱ्या केल्य त्यात मारसिंहाने प्रसंशनीय पराक्रम गाजविला.

कृष्ण राजानंतर राष्ट्रकूट साम्राज्याची स्थिती खालावली. चालुक्य वंशाचा मांडलिक तैल यांनी स्वतंत्र होण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्याचवेळी उत्तरेकडून परमार राजा सीयक यानेही आक्रमण केले. या आपत्तीतून राष्ट्रकूटांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न मारसिंहाने केला. त्यांनी इंद्रराज (चतुर्थ) याला सम्राटपदावर

बसविले. परंतु त्याचा प्रयत्न शेवटी अयशस्वी झाला. तेव्हा मारसिंह व इंद्र या दोघानीही सल्लेखना व्रत स्वीकारुन देहत्याग केला.

राष्ट्रकूट राजांचे अनेक सामंत राजेही जैनधर्माचे उपासक होते. सौन्दतीच्या रद्द शासकांमध्ये सर्वच्या सर्व राजे जैनधर्मावलंबी होते. अमोघवर्ष प्रथमचा प्रतिनिधी शासक बंडकेय हाही जैन होता. हा वनवासीचा अधिकारी असून राजधानीच्या जैन मंदिराला एक गाव दान करण्याची याला आज्ञा मिळालेली होती. बंडकेयचा पुत्र लोकादित्य हा जैनधर्मीय असल्याची माहिती गुणचंद्राने दिली आहे. इंद्र तृतीयचा सेनापती श्रीविजय हाही जैन होता. त्याच्या देखरेखीखालीच जैन साहित्याचा विकास झाला.

उपर्युक्त महाराज, सामंत व पदाधिकारी यांच्या उपलब्ध दानपत्रामुळे त्यांच्या जैनधर्मानुयायाची माहिती होते. याशिवाय अज्ञात असे सत्ताधीश कितीही असतील. या काळात जैन ग्रंथकार व उपदेशकांची एक अखंड सुंदर माळाच तयार झाली. या सर्वांना राजाश्रय असल्यामुळे त्यांच्या साहित्याचा किंवा उपदेशाचा जैन समाजावर मोठा प्रभाव निर्माण झाला. या काळातील, या प्रदेशातील एकंदर लोकसंख्येच्या एक तृतीयांश व्यक्ति जैनधर्माचे उपासक असावेत असे मत इतिहासकारांनी दिले आहे.

पान नं. १३४

उपलब्ध शिलालेखात आढळणाऱ्या सूचनांवरुन त्या काळात अस्तित्वात असलेल्या मठातील जीवनाचे चित्र आढळते. प्रारंभिक कदंब वंशाच्या शिलालेखात माहिती मिळते की, वर्षा ऋतूमध्ये किंवा चातुर्मासात

अनेक जैन साधु एका ठिकाणी रहात असत. वर्षा ऋतूच्या शेवटी ते सुप्रसिध्द जैन पर्युषण उत्सव साजरा करीत असत. जैन शास्त्रामध्ये पर्युषणाला फार महत्वाचे स्थान आहे. दुसरा धार्मिक समारंभ फाल्गुन शुक्ल अष्टमीला सुरु होत असे व तो एक आठवडा चालत असे. राष्ट्रकूट काळातही हा उत्सव मोठया प्रमाणात साजरा होत असावा. राष्ट्रकूट काळातील मंदिरे काही प्रमाणात वैदिक मंदिर कलांची प्रतिलिपी होत. भ. महावीरांचा पूजनविधी विष्णू किंवा शंकराच्या पूजनविधीप्रमाणेच रुढ होऊ लागला होता. जैन मठामधून भोजन किंवा औषधांचीही पूर्ण व्यवस्था ठेवली जात होती. तसेच धर्मशास्त्राच्या शिक्षणाचीही पूर्णपणे व्यवस्था करण्यात येत असल्याची माहिती मिळते. या काळातील समाजात अस्तित्वात असलेल्या जैनधर्म व वैदिकधर्म इत्यादीमध्ये फारसे विभाजन करता येण्याजोगे वेगळेपण राहिलेले दिसत नाही. या उलट या दोन धर्मामध्ये मोठया प्रमाणात सामंजस्य निर्माण झालेले दिसते.

**राष्ट्रकूट राज्यातील साहित्य-** राष्ट्रकूट सम्राटांच्या कारकिर्दीत जैन साहित्यात उल्लेखनीय प्रगति झ ाली असे दिसून येते. या काळातील साहित्य, प्राकृत, संस्कृत, अपभ्रंश आणि कानडी अशा चार भाषामध्ये असून त्याचे विषय सुध्दा सिध्दांत, गणित, व्याकरण, पुराणकथा असे विविध प्रकारचे आहेत. विशेषतः दिगंबर संप्रदायाच्या दृष्टीने हा काळ म्हणजे जैन साहित्याचे सुवर्णयुग होय.

स्वामी वीरसेन - काळाच्या दृष्टीने तसेच महत्वाच दृष्टिनेही या युगातील साहित्यिकातील स्वामी वीरसेन यांचे स्थान पहिले आहे. दिगंबर संप्रदायात सिध्दान्त ग्रंथ म्हणून मान्यता पावलेले दोन ग्रंथ 'षट्खंडागम' व 'कसायपाहुड' यांच्यावर त्यांनी 'धवला' व 'जयधवला' या टीका लिहिल्या. या टिका बहुतांशी प्राकृत गद्यात आहेत. त्यात मधून मधून संस्कृत वाक्यांचाही उपयोग केला आहे. (भाषांच्या या भिन्न उपयोगाला मणिप्रवाल शैली म्हणतात) हे टीकाग्रंथ लिहिताना वीरसेनांनी मूळ ग्रंथाच्या अनेक प्रतीचा उपयोग केला होता. त्यावरुन त्यांची चिकित्सक वृत्ती स्पष्ट होते. कुंदकुंद, समन्तभद्र, पूज्यपाद इत्यादि दिगंबर आचार्यांनी वचने त्यांनी प्रमाणभूत म्हणून वापरली आहेत. कित्येक तांत्रिक मुद्यावर प्राचीन आचार्यांच्या मतामध्ये परस्पर विरोध आढळतो हे त्यांनी अनेक स्थळी मान्य केले आहे, त्यावरुन त्याचा तर्कनिष्ठ दृष्टिकोन स्पष्ट होतो. परंतु कित्येक स्थळी केवळ प्राचीन परंपरेवरच विसंबून न रहाता स्वतःच्या तर्काच्या आधारावरही त्यांनी सूत्राचे स्पष्टीकरण केले आहे. त्यावरुन त्यांची विधायक भूमिकही लक्षात येते. स्वामी वीरसेनांच्या

टीकामधील या विविध गुणामुळे त्या इतक्या लोकप्रिय झाल्या की कुंदकुंद, समन्तभद्र इत्यादि आचार्यांनी पूर्वी लिहिलेल्या टीकांचा अभ्याास बंद पडला. इतकेच नव्हे तर षट् खंडागम व कसायपाहुड या ग्रंथाची मूळ नांवे मागे घडून धवलसिध्दांत व जयधवलसिध्दांत हीच नांवे सर्वत्र प्रसिध्द झाली.

या दोन टीकामधील पहिली टिका धवला ही षट्खंडागमच्या पहिल्या पाच खंडावर लिहिलेली असून य पाच खंडाचे परिशिष्ठ म्हणून सहावे खंड स्वतः वीरसेनानी लिहिलेले आहे. या टीकेचा एकूण विस्तार ७२ हजार श्लोकाइतका आहे. ही टीका सम्राट गोविंद (तृतीय) जयत्तुंग याच्या कार्तिक शुध्द त्रयोदशीला पूर्ण झाली. धवला टीकेची अंतिम प्रशस्ति ही अतिशय अशुध्द असल्याने तिच्या रचनेचे वर्ष कोणते हे निश्चित सांगता येत नाही. डॉ. हिरालाल जैन यांच्या मते सन ८१६ हे ते वर्ष होय, तर बाबू जयप्रसाद यांनी सन ७८० मध्ये ही रचना झाली असे दर्शविले आहे.

पान नं. १३५

**आचार्य जिनसेन -** जिनसेनांनी महापुराण या विस्तीर्ण व महत्वपूर्ण ग्रंथाचे लेखन केले. कवि परमेष्ठी अथवा कवि परमेश्वर या प्राचीन आचार्यांनी वागर्थसंग्रह नांवाचे पुराण पूर्वी लिहिले होते. त्यावरच हे महापुराण आधारलेले आहे. या पुराणांचे उपनाम त्रिपष्ठीलक्षणपुराणसंग्रह असे आहे. त्यात चोवीस तीर्थकर, बारा चक्रवर्ती, नऊ नारायण, नऊ बलदेव आणि नऊ प्रतिनारायण अशा ६३ पुराण पुरुषांच्या कथा ग्रथित केल्या आहेत. याशिवाय या पुरुषाशी जवळचा अथवा दूरचा संबध असलेल्या इतरही पुराणकथांचा यात समावेश आहे. अशा या महापुराणाचा पहिला खंड आदि पुराण हा जिनसेनांनी लिहिला आहे. उरलेला उत्तरपुराणाचा भाग हा त्यांचे शिष्य गुणभद्र यांनी लिहिला आहे. या दोन्ही भागांची श्लोकसंख्या प्रत्येकी सुमारे दहा हजार इतकी आहे.

आदिपुराणामध्ये प्रथम तीर्थकर ऋषभदेव, प्रथम चक्रवर्ती भरत आणि त्याचे बंधु बाहुबली यांची कथा पूर्वजन्माच्या वर्णनासह सांगितली आहे. पद्मचरित व हरिवंशपुराण यांच्याप्रमाणे या पुराणातही इतर अनेक उपकथांचे आणि महत्वपूर्ण विषयांचे वर्णन आले आहे. उपकथामध्ये ऋषभदेवांच्या पूर्वजन्मातील वज्रसंघ व श्रीमती यांची प्रणयकथा काव्यदृष्टीने फार सुंदर आहेत. तसेच भारत चक्रवर्तीचा सेनापती जयकुमार व सुलोचना यांच्या विवाहाची कथाही एखाद्या महाकाव्याइतकीच सुरस झाली आहे. सिध्दांत विषयामध्ये ध्यानाच्या विविध प्रकाराचे विशद वर्णन यात आढळते. भरताच्या दिग्विजयाच्या वर्णनात भारताच्या विविध भागांचा उत्तम परिचय करुन दिला आहे. सृष्टीच्या स्वरुपाविषयी बौध्द, वेदान्त आणि नास्तिक दर्शनाच्या मतांची विस्तृत चर्चा जिनसेनांनी केली आहे, तीही महत्वपूर्ण आहे.

वरील सर्व गुणापेक्षाही महत्वाचे असे एक वैशिष्ठय आदिपुराणात आढळते. समकालीन समाजाच्या विविध आचारांना व्यवस्थित रुप देण्याचा उत्तम प्रयत्न यात केला आहे. अग्निपूजा, स्पृश्यास्पृश्य विचार, विवाहादि संस्काराचे मंत्र इत्यादि विविध विषयाचे वर्णन सर्वात प्रथम याच पुराणात आढळते. जैनेतर समाजाच्या स्पर्धेमध्ये जैनांना कसा टिकाव धरता येईल याविषयी यात बहुमोल मार्गदर्शन केले आहे.

वरील सर्व विशेषतेमुळेच त्या काळच्या समाजात जिनसेनांना फार मानाचे स्थान प्राप्त झाले. राजा अमोघवर्ष त्यांना प्रणाम करण्यात धन्यता मानीत असे, असे वर्णन उत्तर पुराणात आहे ते याचेच प्रतीक होय.

आचार्य गुणभद्र- हे जिनसेनांचे शिष्य होते. यांनी महापुराणाचा दुसरा खंड म्हणून उत्तरपुराण लिहिले. हे पूर्वी सांगितलेच आहे. या पुराणाची रचना सम्राट अकालवर्षाचा सामंत लोकादित्य याची राजधानी बंकापु येथे पूर्ण झाली. या पुराणाचा एक पूजामहोत्सव सन ८१८ मध्ये झाला होता. त्याच्य रचनेमध्ये गुणभद्राचे शिष्य लोकसेन यांनीही सहाय्य केले होते असे त्याच्या प्रशस्तीवरुन कळते. या पुराणात ऋषभदेव व भरत यांच्यनंतरच्या ६१ पुराणपुरुषाच्या कथा ग्रथित केल्या आहेत. थोडय विस्तारात अनेक कथा सांगावयाच्या असे धोरण ठेवल्यामुळे याची रचना सूत्रमय झाली आहे. पुराण कथावरील सर्वात पहिला सर्व

संग्राहक ग्रंथ या दृष्टीने हा ग्रंथ महत्वाचा आहे. आत्मानुशासन हा सुभाषित ग्रंथही गुणभद्रांची दुसर रचना आहे. यात सम्यग्दर्शनाराधना, सम्यग्ज्ञानाराधना, सम्यक्चारित्राराधना व सम्यक्तपाराधना या चार आराधनांचे वर्णन केले आहे. त्यातील कित्येक श्लोक फार सोपे आणि रसपूर्ण आहेत. संसाराची दु:खमय अवस्था आणि वैराग्याची आवश्यकता याचे यातील वर्णन परिणामकारक आहे. याशिवाय जिनदत्तचरित्र हे एक लहानसे काव्यही गुणभद्रांनी लिहिले आहे.

आचार्य महावीर- जैन तत्वज्ञानात संख्या गणनेला फार महत्वाचे स्थान आहे. प्रत्येक वस्तुतत्वाचे ज्ञान संपूर्णपणे निश्चित स्वरुपात व्हावे. याकरिता गणिताच्या विविध प्रक्रियांचा उपयोग प्राचीन ग्रंथात केलेला आढळते. परंतु गणित या विषयावरील पहिला स्वतंत्र ग्रंथ लिहिण्याचे श्रेय जैन साहित्यात आचार्य महावीर यांना द्यावे लागते.

पान नं. १३६ वरुन

यांनी 'गणितसारसंग्रह' या आपल्या ग्रंथात बेरीज, वजाबाकी यासारख्या सामान्य अंकगणितापासून प्रारंभ करुन द्विपद समीकरणासारख्या बीजगणितातील कठिण विषयापर्यंत गणितशास्त्राची व्यवस्थित मांडणी केली आहे. या ग्रंथाच्या पहिल्या आठ श्लोकात राजा अमोघवर्ष याची सुदंर स्तुति केली आहे. वर्णनावरुन अमोघवर्षाने मुनिदिक्षा स्वीकारली होती असे सूचित होते.

**आचार्य शाकटायन-** याचे मूळ नांव पाल्यकिर्ती असे होते. हे यापनीय संघाचे आचार्य होते. वैदिक काळात शाकटायन नांवाचा थोर व्याकरणकार होऊन गेला. त्याप्रमाणे हेही व्याकरण शास्त्रात निष्णात होते. म्हणून यांना शाकटायन हे बिरुद मिळाले. यांनी संस्कृत भाषेचे 'शब्दानुशासन' नांवाचे व्याकरण लिहिले व त्यावर 'अमोघवृत्ती' नांवाची टिकाही लिहिली. स्त्रीमुक्ती केवलिमुक्ती प्रकरण हा यांचा दुसरा ग्रंथ होय. स्त्रियांना मोक्षप्राप्त होतो आणि केवलज्ञानी पुरुषसुध्दा सर्वसामान्य मानवाप्रमाणेच भोजन करतात या मतांचे तर्कशास्त्रदृष्टया समर्थन करणारा हा पहिला स्वतंत्र ग्रंथ होय. समकालीन घटनांचे उदाहरण म्हणून अमोघवर्षाने आपल्या शत्रूंचा नाश केला, 'अदहरमोघवर्षोरावीन्' असे वाक्य शाकटायनांनी दिले आहे. त्यावरुन व त्याच्या टीकेच्या नांवावरुनही ते अमोघवर्षाच्या राज्यकाळात झाले असे दिसून येते.

**आचार्य इन्द्रनन्दि-** दृष्टिवाद या बाराव्या अंग ग्रंथातील विद्यानुवादपूर्व नामक प्रकरणात मंत्रतंत्रानी प्राप्त होणाऱ्या अनेक अदभुत शक्तींचे वर्णन केले होते असे प्राचीन ग्रंथात वर्णन आहे. समन्तभद्र, जिनसेन इत्यादी प्राचीन आचार्यांनी मंत्र शक्तीने अनेक चमत्कार करुन दाखविले अशाही कथा आहेत. परंतु या विषयावर पहिला स्वतंत्र ग्रंथ लिहिण्याचा मान आचार्य इन्द्रनंन्दि याना दिला पाहिले. कृष्ण (तृतीय) याच्या राज्यात राजधानी मान्यखेट येथे सन ९४० मध्ये त्यांनी 'ज्वालिनीत' हा ग्रंथ लिहिला. आठवे तीर्थकर चंद्रप्रभ यांची उपासिका शासनदेवता ज्वालिनी (अथवा ज्वालामालिनी) हिची कृपा कशी संपादन करावी त्याचे या ग्रंथात वर्णन आहे. त्यायोगे विविध भूतपिशाचांच्या बाधा कशा दूर होतात तेही यात विस्ताराने सांगितले आहे. कामसिध्द करणाऱ्या कित्येक गुटिका व इतर औषधे याचाहि परिचय यात मिळतो. आचार्य इन्द्रनन्दी हे बप्पनंदीचे शिष्य होते. त्यांच्यापूर्वी पाच सहा पिढयांच्या अगोदर झालेले द्रविड गणाचे आचार्य हेलाचार्य हे या ज्वालिनीमताचे प्रवर्तक होते असे त्यांनी नमूद केले आहे.

**सोमदेवसूरि-** मंत्रशास्त्राप्रमाणेच राजनीतीशास्त्र य विषयवरील स्वतंत्र ग्रंथही कृष्णराजाच्याच कारकिर्दीत लिहिण्यात आला. या 'नीतिवक्यामृता' चे लेखक आचार्य सोमदेव हे गौड संघाचे आचार्य नेमिदेव याचे शिष्य होते. आदर्श राज्यात राजा, त्याचे अधिकारी, सेना आणि प्रजा यांचे स्वरुप काय असावे याचे उत्तम वर्णन त्यांनी नीतिवाक्यमृतात केले आहे. या विषयावर चाणक्याच्य कौटिलीय अर्थशास्त्रापासून जे ग्रंथ जैनेतर विद्वानांनी लिहिले होते या सर्वाचा सोमदेवांनी सखोल अभ्यास केला होता असे त्यांच्या ग्रंथावरुन दिसते. 'यशस्तिलक' हाही सोमदेवांचा ग्रंथ त्यांच्या अनेक वैशिष्ठयामुळे फार प्रसिध्द झाला आहे. कृष्ण राजाचा सामंत चालुक्यवंशीय बद्दिग याची राजधानी गंगधारा येथे सन ९५९ मध्ये या ग्रंथाची रचना पूर्ण झाली.

हा चंपू ग्रंथ असून संस्कृत गद्य व पद्याचा यात सरमिसळीने उपयोग केला आहे. मुनिसुव्रत तीर्थकराच्या तीर्थातील पुराणप्रसिध्द राजा यशोधर याची कथा यात वर्णिली आहे. चंडिक देवीपुढे एक कोंबडा बळी देण्याच्या संकल्पामुळे यशोधर व त्याची आई चंद्रमती यांना विविध दुर्गतीत भ्रमण करावे लागते व शेवटी आचार्य सुदत्त यांच्या उपदेशामुळे त्यांना सध्दर्माची प्राप्ती होते असे या कथेचे स्वरुप आहे. संस्कृत ललित साहित्याचा दृष्टीने हा ग्रंथ विशेष महत्वचा आहे. विविध रसांचा परिपोष त्यात प्रभावी भाषेत केलेला आढळतो. याशिवाय तत्कालीन समाजजीवनाचे प्रतिबिंबही त्यात उत्तम प्रकारे पडले आहे. विशेषतर राजदरबाराचे त्यातील चित्रण उल्लेखनीय आहे. यावरुन जैन

पान नं. १३७ वरुन

व जैनेतर साहित्याचा सोमदेवांचा व्यासंग किती दांडगा होता याचा पदोपदी प्रत्यय येतो. याच्या शेवटच्या तीन प्रकरणात जैन गृहस्थांच्या आचार धर्माचे विस्तृत व व्यवस्थित वर्णन केले आहे. या दोन ग्रंथाशिवाय सोमदेवांचा 'अध्यात्मतरंगिणी' हा एक ग्रंथ उपलब्ध आहे. 'युक्ति चिंतामणिस्तव' 'त्रिवर्गमहेंद्रमातलिसंजल्प' 'पण्णवतिप्रकरण' व 'स्याद्वादोषनिषत्' हे आणखी चार ग्रंथ त्यांनी लिहिले होते असे, यशस्तिलक चंपूच्या प्रशस्तीवरुन कळते. तथापि हे ग्रंथ आज उपलब्ध नाहीत.

**महाकवी पुष्पदंत-** स्वयंभूदेवानंतरच्या अपभ्रश साहित्यिकांमध्ये पुष्पदंत यांचे स्थान सर्वाच्च आहे. हे ब्राह्मण कुळात जन्मले असून, त्यांच्या पित्याचे नांव केशवभट्ट व मातेचे नांव मुग्धादेवी असे होते. पुष्पादंत प्रथम शैव होते, तथापि मातापित्यासह त्यांनी जैनधर्माचा स्वीकार केला व शेवटपर्यंत त्याचे निष्ठेनी पालन केले. पुष्पदंत दिसायला कुरुप होते व त्यामुळेच की काय सर्वसामान्य लोकांनी प्रथम त्यांची अवहेलना केली. स्वाभिमानी पुष्पदंत. सम्राट कृष्णराजाच्या सैन्याचा त्यावेळी तेथे मुक्काम होता. सम्राटाचे मंत्री भरत व त्याचे पुत्र तन्न यांची पुष्पदंताशी येथेच भेट झाली. भरत हे कुशल मुत्सद्दी तसे रसिक श्रोतेही होते. पुष्पदंताची अलौकिक काव्यप्रतिभा पाहून त्यांनी त्यांना मान्यखेट येथे नेले व त्यांच्या काव्यरचनेला प्रोत्साहन दिले.

यशोधरचरित्र (जसहरचरिउ) व नागकुमारचरित (णायकुमारचरिउ) ही दोन काव्ये व तिसद्दिसलागामहापुरिसगुणालंकार (महापुराण) हे विस्तृत पुराण असे तीन अपभ्रंश ग्रंथ पुष्पदंतानी लिहिले आहेत. या तीनही ग्रंथाची कथानके जुनीच असली तरी, कवीनी त्यांचे चित्रण इतक्या सुंदर व रसाळ भाषेत केले आहे की, अद्यापि रसिकांना ती मोहक वाटतात. पं. प्रेमींच्या शब्दात सांगायचे तर, पुष्पदंताच्या कवितेमध्ये जे ओज, जो प्रवाह, जो रस व जे सौंदर्य आढळते ते इतरत्र दुर्लभ आहे. भाषेवर त्यांचे अलौकिक प्रभुत्व आहे. त्यांची शब्दसंपत्ती विशाल व रचना अलंकारांनी समृध्द आहे. समाज त्यांच्या कविता वाचताना गावाना अजूनही मंत्रमुग्ध होतो.

**आचार्य शिवकोटी-** याचा 'तोड्ड आराधना' हा गद्य ग्रंथ उपलब्ध कन्नउ साहित्यात सर्वात प्राचीन समजला जातो. ज्ञान, दर्शन तप व चरित्र यांची निष्ठेने साधना करणाऱ्या कित्येक मुनींच्या कथा या ग्रंथात आहेत. याचा रचनाकाळ निश्चित नसला तरी तो नवव्या शतकाहून अर्वाचीन नाही असे मानले जाते. शिवकोटी हे संमतभद्राचे शिष्य होते असे काही कथांमध्ये वर्णन आहे. त्यांनी तत्वार्थसूत्रावर एक टीका लिहिली होती असे ११ व्या शतकातील एका शिलालेखात म्हटले आहे. नवव्या शतकातच सम्राट नृपत्तुंग अमोघवर्षाने लिहिलेला कविराजमार्ग हा ग्रंथ कन्नड साहित्य शास्त्रावरील पहिला व उत्कृष्ट ग्रंथ होय. काव्याचे विषय कोणते असावे, त्यांचे चित्रण कसे करावे आणि अलंकाराचा उपयोग कसा करावा याचे विस्तृत विवरण या ग्रंथात केले आहे. उदाहरणाकरिता यात कित्येक प्राचीन कवींची पद्ये दिली आहेत. त्यावरुन अमोघवर्षापूर्वीही कन्नड साहित्य बरेच समृध्द झाले होते असे दिसून येते.

कन्नड साहित्याचे सुवर्णयुग- राष्ट्रकूट साम्राज्याच्या उत्तरार्धात जैन आचार्यांनी संस्कृत व प्राकृत भाषेत अनेक अभिनव विषयांवर ग्रंथरचना केली हे पूर्वी दर्शविले आहे. कानडी साहित्यातही या काळात पंप,

पोन्न व रन्न या जैन महाकवींनी केलेली साहित्य निर्मिती सरसतेच्या दृष्टीने अपूर्व आहे. त्यामुळेच दहावे शतक हे कन्नड साहित्याचे सुवर्णयुग समजले जाते.

पंप (यालाच आदिपंप असेहि म्हणतात) हा कन्नड साहित्यातील सर्वश्रेष्ठ कवि मानला जातो. याचा पिता प्रथम ब्राह्मण होता, नंतर त्याने जैनधर्माचा स्वीकार केला. पंप हाही जैनधर्माचा उपासक राहिला. राष्ट्रकूटांचा सामंत अरिकेसरी हा याचा आश्रयदाता होता. पंपाचा जन्म सन ९०२ मध्ये झाला. आदिपुराण व

पान नं. १३८ वरुन

विक्रमार्जुनविजय या दोन महाकाव्यांची रचना त्याने सन ९४१ मध्ये पुर्ण केली. आदिपुराणात प्रथम तीर्थकर ऋषभदेव व त्यांचे पुत्र भरत आणि बाहुबली यांची कथा वर्णिली आहे. विक्रमार्जुनविजय हा ग्रंथ पंपभारत या नांवानेही प्रसिध्द आहे. अर्जुन हा मुख्य नायक कल्पून महाभारताची कथा यात वर्णिली आहे. यातील कर्ण व दुर्योधनाचे स्वभावचित्रणही सुंदर उतरले आहे. महाभारताची कथा सांगतानाच पंपाने त्याचा आश्रयदाता अरिकेसरी याच्याही पराक्रमाने या काव्यात वर्णन केले आहे.

पोन्न हा कवीही प्रथम अजैन होता. जैन धर्माचा स्वीकार केल्यावर त्याने शान्तिपुराण हे प्रसिध्द महाकाव्य लिहिले. सोळावे तीर्थकर शान्तिनाथ यांनी चक्रवर्तिपद प्राप्त करण्याकरिता केलेला दिग्विजय आणि नंतर मोक्ष प्राप्त करण्याकरिता केलेली तपश्चर्या यांचे सुंदर वर्णन या काव्यात केले आहे.

रन्न कवि जातीने कासार होता. प्रथम गंग राजांचा सेनापती चामुण्डराय आणि नंतर कल्याणचा चालुक्य सम्राट आहवमल्ल यांचा आश्रय त्याला मिळाला. याने सन ९९३ मध्ये अजितपुराण हे काव्य लिहिले. दुसरे तीर्थकर अजितनाथ व दुसरा चक्रवर्ती सगर यांची कथा यात वर्णिली आहे. याचे दुसरे काव्य गदायुध्द हे भीम व दुर्योधन यांच्यतील द्वेषाच्या पार्श्वभूमीवर लिहिले आहे. पंपभारताप्रमाणे यातही कवीने भीमाबरोबरच आपला आश्रयदाता सम्राट आहवमल्ल याच्यही पराक्रमाचे वर्णन केले आहे.

दक्षिणेत बलवान स्थिर व विस्तारित साम्राज्य, मोठया प्रमाणातील साहित्य निर्मिती या वैशिष्ठयाप्रमाणेच या साम्राज्याच्या कारकीर्दीत कलेच्या क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी झाली. वेरुळ येथील सुप्रसिध्द लेण्यापैकी शिवाच्या सुंदर मूर्तीकरिता प्रसिध्द असलेले कैलास लेणे सम्राट कृष्ण द्वितीय याने कोरविले होते. वेरुळची जैन लेणी सुध्दा उत्कृष्ट कोरीव कामाकरिता विख्यात आहेत. त्यातील इंद्रसभा व जगन्नाथसभा या दोन लेण्यामधील स्तंभावरील नक्षीकाम व तीर्थकरमूर्ति अतिशय सुंदर आहेत. या लेण्यांच्या खोदकामाचा प्रारंभही राष्ट्रकूट राज्यातच झाला व हे काम अकराव्या शतकापर्यंत चालू राहिले.

**चालुक्य-**

दक्षिणेतील मध्यकालीन प्रमुख राजवंशात चालुक्य वंशाचे नाव उल्लेखनीय आहे. पुलकेशी प्रथमने या वंशाची स्थापना केली. त्याची राजधानी बदामी होती. त्याचा पौत्र पुलकेशी दुसरा हर्षाच्या समकालीन होता. पुलकेशीने हर्षाचा पराभव केला तरी पल्लव राजांनी पुलकेशी दुसरा याचा पराभव केला. तथापि यानंतर बत्तीस वर्षानी पुलकेशीच्या एका मुलाने आपल्या पित्याच्या पराभवाचा बदला घेतला व कांचीवर आपला अधिकार प्रस्थापित केला. पल्लव व चालुक्यांमधील संघर्ष अनेक वर्षे चालू होता, तथापि आठव्या शतकाच्या मध्याला राष्ट्रकूटांनी चालुक्यांचा पराभव केला व दोनशे वर्षाची चालुक्याची सत्ता नष्ट केली व आपली सत्ता स्थापन केली. अंतिम राष्ट्रकूट राजाला पराभूत करुन ९७३ मध्ये तैलप द्वितीयने दुसऱ्या चालुक्य राजवंशाची स्थापना केली व कल्याणी येथे आपली राजधानी स्थापन केली.

चालुक्याचा काळ जैनधर्माच्या दृष्टीने उल्लेखनीय आहे. कारण चालुक्य सत्ताधीशांनी हिंदु धर्माला राजाश्रय दिलेला असला, तरी परधर्मसहिष्णुतेच्या त्यांच्या धोरणामुळे जैन धर्माची प्रगतीच झाली. डॉ. भांडारकरांच्या मते बदामीच्या चालुक्य राजांच्या काळात जैनधर्माला प्रमुखता मिळाली. कारण या काळात

बौध्द धर्माला संरक्षण मिळाल्याचा कसलाही उल्लेख मिळत नाही. यावर चालुक्य राजांनी जैनधर्माला दिलेल्या संरक्षणाविषयीचे अनेक उल्लेख मिळतात.

पान नं १३९

श्री.एस.आर.शर्मानी १ लिहिले आहे की, जयसिंहाचे पुत्र रणरंग व त्याचा पुत्र पुलकेशी प्रथम यांनी जैनधर्माला संरक्षण दिले होते. रणरंगाच्या काळात दुर्गाशक्ति नावाच्या एका जैनाने जिनालयाला दान दिले होते. तर पुलकेशीनी अलक्त नगरातील जिनालयाला दान दिले होते. शिलालेखात लिहिले आहे की, राजा सत्याश्रयाने जिनालयाला योग्य भूमि व दान दिल्याची माहिती मिळते. त्याचा उत्तराधिकारी किर्तीवर्मानेही धारवाडच्या प्राचीनतम कन्नड शिलालेखानुसार जैनांना दान दिल्याची माहिती मिळते. त्याचा उत्तराधिकारी किर्तीवर्मानेही धारवाडच्या प्राचीनतम कन्नड शिलालेखानुसार जैनांना दान दिल्याची माहिती मिळते.

चालुक्याच्या सर्व शिलालेंखात पुलकेशी द्वितीयचा ऐहोळचा शिलालेख सर्वात प्रसिध्द आहे. त्याची रचना रविकिर्तीनी केली असुन, त्यात लिहिले आहे की२, जिनेंद्राच्या या पाषाण मंदिराची निर्मिती रविकिर्तीनी केली व त्याला कार्यात राजा सत्याश्रयचे बहुमोल सहाय्य झाले. ज्या मेगुटी मंदिरात हा शिलालेख आहे त्याच्या शेजारीच जैन गुफा आहे. श्री. पटीटच्या मते या मंदिराला नंतर लिंगपूजेत परिवर्तित करण्यात आले.

विक्रमादित्यानंतर त्याचा पुत्र विनयादित्य राज्यशासन करू लागला. डॉ. भांडारकरांच्या मतानुसार त्याचा राज्यकाल ६८०-६९६ होता. विनयादित्यानंतर त्याचा पुत्र विजयादित्य गादीवर आला. भांडारकरांनी लिहिले आहे की, विनयादित्याने दिगंबर जैन मूलसंघ देवगणाचे उदयदेव पंडित उपनाम निरवंद्यपंडिताला जैन मंदिराच्या प्रबंधासाठी एक गाव दान दिले. शिलालेखात निरवंद्य पंडिताला विजयादित्यच्या पित्याचा धार्मिक गुरू लिहिले आहे. एका श्लिालेखात लिहिले आहे की, विक्रमादित्य द्वितीय याने पुलिगेरे नगरात धवल जिनालयाची सजावट केली. तसेच मूलसंघ देवगाणाच्या विजयदेव पंडिताचार्याच्या जिनपूजेसाठी भूमिदान केले. विक्रमादित्य द्वितीय नंतर किर्तीवर्मा द्वितीय गादीवर आलो. त्या आठव्या शतकाच्या मध्याला राष्ट्रकूट राजा नंदिदुर्गानी पराभूत केले व प्रथम चालुकय वंश समाप्त झाला. डॉ. भांडरकरांच्या मतानुसार मध्यकाळातच चालुक्यांच्या अनेक शाखा अस्तित्वात होत्या. म्हैसूनच्या विमलादित्य चालुक्याचा एक ताम्रपट मिळाला आहे. या निरनिराळया शाखातील चालुक्यानीही जैनधर्माला राजाश्रय दिल्याची माहिती मिळते.

दहाव्या शतकाच्या शेवटी तैलप याने चालुक्य वंशाची स्थापना करून कल्याणीला राजधानीचे स्थान दिले. तैलपही जैनधर्माच्या बाबातीत उदार होते. त्याने अजितपुराणचा रचयिता कन्नड कवि रत्रला याने आश्रय दिला होतो व रत्रला कवि चक्रवर्ती उपाधि दिली. तैलपाचा पुत्र सत्याश्रय याने जैनगुरूच्या स्मृतीप्रीत्यर्थ एक निषीधिका निर्माण केली. त्याच्या गुरूचे नाव विमलदेव पंडित होते व ते द्रविडसंघ मुनि भट्टरकाचे शिष्य होते. सत्याश्रयानंतर त्याचा पुतण्या विक्रमादित्य गादीवर आला. त्यानंतर त्याचा भाऊ जयसिंह गादीवर आला. त्याने १०४० पर्यंत राज्य केले, हा राजा जैन विद्वानांचा आश्रयदाता होता३. वदिराज, दयापाल, पुष्पषेण, सिध्दांत देव हे या काळातील प्रसिध्द विद्वान होते. वदिराजनी आपले पार्श्वनाथ चरित चालुक्य चक्रवर्ती जयसिं देवाच्या राजधानीत शक ९४७ मध्ये पूर्ण केले.

जयसिंहानंतर त्याचा पुत्र सोमेश्वर राजा झाला. वेल्लरी जिल्हयात कौगली नांवाच्या ठिकाणी मिळालेल्या दोन शिलालेखावरून सोमेश्वर प्रथम स्याद्वाद सिध्दांताचा अनुयायी होता असे दिसते. त्याची राणी केतल देवीच्या कर्मचाऱ्यांनी त्रिभुवन तिलक जिनालयातील तीन वेदी बांधल्या.

सोमेश्वर प्रथम नंतर सोमेश्वर द्वितीय गादीवर आला. त्यानी मूलसंघ काणूरगणाच्या चंद्रदेवाला शांतिनाथ जिनालयासाठी नगरखंडाचा एक भाग दान दिला. यानंतरविक्रमादित्य (१०७६-११२६) गादीवर आला. प्रसिध्द कवी विल्हणाने त्याचे चरित्र विक्रमांक देवचरितमध्ये रेखाटले आहे. या राजाने बेळगोळ प्रदेशात अनेक जिनालये बांधली. या राजाने जैन मुनि वासव चंद्राला बालसरस्वतीची उपमा दिली होती.

**वेंगीचे चालुक्य -**

चालुक्य वंशाची एक शाखा पूर्वीय किंवा वेंगीचे चालुक्य या नावाने प्रसिध्द आहे. या शखेची पंरपरा पुलकेशी दुसरा याचा भाऊ विष्णुवर्धन याचे पासून चालत आलेली आहे. मदनूर येथे मिळालेल्या शिललेखात विष्णूवर्धनापासून ते या वंशातील २३ वा राजा अम्म द्वितीय पर्यंतच्या वंशावलीची माहिती दिलेली आहे. या घराण्यातील काही राजांनी जैनधर्माचा स्वीकार केले होता. याच शिलालेखात अम्राज वियादित्य याने कटकाभरण जिनालयाच्या पूजादिक विधिसाठी स्वतंत्र गाव दान दिल्याची माहिती मिळते. कळचुम्बरू येथे मिळालेल्या शिलालेखात अम्मराजानी सर्व लोकाश्रय जिन भवनाच्या व्यवस्थेसाठी अर्हनंदि मुनींना कळचुम्बरू नावाचे गाव दान दिले. हे दान राजानी, श्राविकेनी तयाच्या मानावर केलेल्या धार्मिक परिणामामुळे दिले असे मानतात. गुडगेरी येथे मिळालेल्या एका शिलालेखात चालुक्य चक्रवर्ती विजयादित्य व त्याची भगिनी कुंकुमदेवीचा उल्लेख आहे व कुंकुमदेवीनी एक जिन मंदिर बांधले असे त्यात म्हटले आहे. वेंगीच्या चालुक्य राजांनी जैनधर्माला राजधर्माचे स्थान दिलेले नसले तरी सामान्यतः त्यांनी स्वीकारलेल्या परधर्मसहिष्णुतेच्या धोरणामुळे या कळात जैनधर्माचाही मोठया प्रमणात प्रसार झाला. या राजानीही जैनधर्माला आवश्यक ते सर्व संरक्षण दिले व त्यामुळे या काळातही जैनधर्माचा प्रभाव समाजा चांगल्या प्रकर पडू शकला.

**होयसळ वंश-**

बाराव्या शतकामध्ये दक्षिण भारतात चालुक्य घराण्याच्या विनाशनंतर होयसळ घराण्याची स्थापना

झाली. होयसळ हे कर्नाटक प्रदेशातीलच निवासी असून, त्यांनी पश्चिमीय चालुक्यांच्या सत्तेवर आक्रमण करून, कर्नाटकाच्या दक्षिण भागावर आपली अधिसत्ता प्रस्थापित केली. म्हैसूरपासून तुंगभद्रा नदीपर्यंतच्या प्रदेशावर या घराण्याची सत्ता होती. होयसळांचे मूळ निवास्थान मुदगेरे तालुक्यातील अंगदि ऊर्फ शश्कपुर नगर होते. हे स्थान प्रथ्मपासूनच जैनधर्माचे प्रमुख केंद्र होते. होयसळांचे पूर्वज राष्ट्रकुट, उत्तर चालुक्यांचे मांडलिक होते. ११ व्या शतकाच्या सुरूवातीला या वंशाचा प्रमुख सल नावाचा तरूण होता. तो महत्वाकांक्षी व उतही होता. अंगदीच्य जैनाचार्य सुगत यांच्या वर्धमान विद्यापीठात अनेक गृहस्थ, त्यागी, मुनी विद्या ग्रहण करीत. एकदा सल आपले गुरू सुगताजवळ अध्ययन करीत असतात एक भयानक सिंह गुरूंच्या अंगावर आला. गुरूंनी आपला दंड (मयुरपिच्छ) त्याच्याकडे फेकून पोयसल (हे सल याला मार) म्हणून सांगीतले. सलने सिंहाला मारले. गुरूनी सलची वीरता व पराक्रम पाहण्यासाठीच हा प्रसंग घडविला. त्यानंतर गुरूंनी सल याला स्वतंत्र राज्य स्थापण्याचा आशीर्वाद दिला. सिंह त्याचे वियजचिन्ह ठरविले.. पोयसलचे पुढे होयसमध्ये रूपांतर झाले. ही घटना १००६ च्या सुमारास घडली. पुढे सल, त्याचा पुत्र विनयादित्य प्रथम, पौत्र नृपकम होयसळयांनी सुगत वर्धमानला आपले गुरू मानून आपला पराक्रम व शक्ति वाढविण्यास सुरूवात केली. त्यानंतर विनयादित्य द्वितीयने आपले गुरू शंतिदेव यांच्या आशीर्वादाने सत्ता वाढविली. सन्मान केला व आयुष्याच्या शेवटी राज्यकारभार पुत्रावर सोपवून राजा धर्मसाधनेत मग्न झ ाला. होयसळ राजांना आता मेलप्पशिरोमणि, महामंडलेश्वर इत्यादी उपाध्या मिळाल्या. बल्लाळ प्रथम (११०१-११०६) चे राजगुरू चारूकिर्ती पंडितदेव होते. ते आयुर्वेद, न्याय, सिध्दांत योग इत्यादी विषयात पारंगत होते. सुप्रसिध्द विष्णुवर्धन होयसळ (११०६-११४१) या घराण्यातील प्रभावी राजा होय. त्यांनी चालुक्यापासून स्वतंत्रता मिळवली. चोलांना पराभूत करून हाकलून दिले. तथापि याने जैनधर्म विरोधी धोरण स्वीकारले असे मानतात. तथापि विष्णुवर्धन याने जैन वस्तींना दान दिले, जैनगुरू श्रीपाल त्रैविद्यव्रतीचा सम्मान केलो. शल्यनगर येथे एक विहार बांधला. जैन ऋषींच्या प्रबंधासाठी काही गावे दान दिली. त्याच्या बोप्प, मारिय, भट्ट इत्यादी अधिकाऱ्यांनी जैनवस्ती बांधल्या. दंडाधिपतीने वजिय पार्श्वदेवाचे माहान मंदिर बांधले. अन्य जिनालयासाठी गावे दान दिली. महाराज विष्णूवर्धनची पट्टराणी शंतलदेवी, हिला दान कणे व शलाकापुूरूषांचे चरित्र ऐकण्यात आनंद वाटे. तिने ११२३ मध्ये श्रवणबेळगोळ येथे तीर्थकारांची मूर्ति बसविली. सुंदर वस्ती स्थापली व राजाच्या संमतीने स्वगुरू प्रभाचंद्र यांना ग्राम दान दिले. हिने शिवगंगा तिर्थावर जाऊन आपल्या गुरूच्या उपस्थितीत समाधिमरण स्वीकारले. तिच मत मकिब्बनेही

सल्लेखनापूर्वक समाधिमरण स्वीकारले. विष्णूवर्धनाचे मंत्री, मांडलिक, सरदार जैनधर्मानुयायी होते. होयसळ सेनापतीनी होयसळ सत्तेला एक महान साम्राज्य बनविले. निरनिराळया शत्रुंचा संहार केला.

विष्णूवर्धनचा प्रमुख पहिला सेनापती गंगराज होता. हा वंश सुरूवातीपासून जैन होता. पांडय व चौलांचा पराभव करून त्याने विष्णूवर्धनाला निष्कष्टक केले. त्यामुळे विष्णुवर्धनचा उजवा हात झाला. या कार्याबद्दल विष्णुवर्धनानी त्याला गंगवाडी दान दिली. गंगराजानी गंगवाडीच्या जैन तीर्थ व जैन वस्तीची दुरूस्ती व संरक्षण केले, गंगवाडीचे येणारे सर्व उत्पन्न गंगराजानी श्रवणबेळगोळ येथील तीर्थाची उन्नती, प्राचीन वस्तींचे संरक्षण, नवीन निर्मिती इत्यादीसाठी खर्च केले. गंगराजाचे पुत्र व पत्नीही जिनभक्त होती. ११३३ मध्ये गंगराजाच्या मृत्युनंतर एचिराज याने द्वारसमुद्रात आपल्या पित्याच्या स्मृतीप्रित्यर्थ विशाल सुंदर जिनालय बांधले, जे विजय पार्श्वनाथ नावानी प्रसिध्द आहे. सेनापती बोप्प आपल्या पित्याप्रमाणेच उदार व वीर होता. त्याने शंतीश्वर वस्ती व बोप्पन चैत्यालयाची निर्मिती केली. १११८ मध्ये त्याने श्रीवणबेळगोळ येथे एक जिनालय बांधले व ११२१ मध्ये समाधिमरण स्वीकारले.

विष्णुवर्धनचा दुसरा जैनमंत्री पुण्सिमय्य धर्मानुरागी व उदार होतो. त्योन अनेक जैन मंदरि बांधली व निस्सहाय व्यक्तीना मदत केली. दंडनायक बदलेवण्ण माहराज विष्णूचा तिसरा सेनापती होता. तो परम जैनभक्त होता. मरिया व भरतेश्वर हेही विष्णुवर्धनचे दंडनायक असून जिनभक्त होते. त्यांनी अनेक जैन मंदिरे बांधली इमडि दंडनायक बिट्टीमय्य हाही विष्णुवर्धनाचा एक सेनानी होता. त्यानी विष्णुवर्धन जिनालयाची निर्मिती केली. व राजकडून मिळालेली सर्व गावे त्याने जैनमंदिरे व मुनींच्या आरासाठी दान दिली.

अशा प्रकारे आपल्या जैन मंत्री, सेनापती इत्यादींच्या मदतीने विष्णूवर्धनाने आपले साम्राज्य प्रगतीशील बनविले. त्याच बरोबर श्लिप-स्थापत्यातही होयसल शैलीचे वेशिष्ठ्य निर्माण केले. विद्या, साहित्य लोकापयोगी कार्याचा सर्वांगीण उत्कर्ष केलो. विष्णुवर्धनांच्या मृत्युनंतर विजय नरसिंहदेव प्रथम (११४१-११७३) राजा झाला. देवराज हुल्ल, शांतियण्ण व ईश्वर इत्यादि स्वाभिमानी सेवक सेनानी त्याला मिळाले होते. हे सर्व जिनभक्त असून त्यांनी अनेक जिनालयांची स्थापना केली. तसेच आपल्या पराक्रमाने होयसळ साम्राज्य स्थिर केले.

नरसिंहचा पुत्र बल्लाळ द्वितीय विष्णुवर्धनप्रमाणे वीर पराक्रमी, महान विजेता व स्याद्वादाचा पुरस्कर्ता होतो. या राजानी अनेक वेळा जैन तीर्थाची यात्रा केली, जैन वस्ती व गुरूना दान दिले. बल्लाळाचेही हुल्क वसुघेकबांधव रेचिमय्य, भरत, बाहुबली इत्यादि सेनानी व निरनिराळे अधिकारी असून ते जिनभक्त होते. त्यांनी अनेक जिनालये, जिनमूर्तीची स्थापना केली. बूचिराज चंद्रमौली हे या राजाच्या दरबारातील प्रसिध्द विद्वान होते. त्यांनीही अनेक जिनमंदिराना मदत केली. या राज्यकाळातील शंतले, मालब्बे, जक्कबे व सम्भ्रान्त इत्यादी महिलांनी धर्म कार्य करून समाधिमरण स्वीकारले१. बल्लाळचा जैनमंत्री नामसेन जिनमंदिर प्रतिपाल म्हणून ओळखला जाई. श्रवणबेळगोळच्या पार्श्वमंदिरात ११९५ मध्ये त्याने नाट्यभवन बांधले. श्रीनिलय नावाचे कलापूर्ण मंदिर बांधलृे याशिवाय दंडनाथ नावाच्या त्याच्या नैन मंत्र्यानी १००९ मध्ये एरम जिनालय नावाचे भव्य जिनमंदिर बांधले. बललाळ द्वितीयने नेमिचंद्र, राजादित्य, माहकवी जन्न, जगदल्ल सोमनाथ, बधुवर्य वैश्य, शिशुमारन, माल्लिकार्जुन इत्यादी विद्वानांना आश्रय दिला होता. हे विद्वान प्राय: जैन होते व त्यांनी कन्नड साहित्याचा पुरस्कार केला होता. वीर बललाळने देवगिरीच्या यादवांचा पराभव करून दक्षिणेतील आपले साम्राज्य बलवान बनविले. या काळातील जिनमंदिरे होयसळ

शिल्प व मूर्तिकलेले उत्कृष्ट नमुने आहेत२. यानंतर नरसिंह द्वितीय, सेमेश्वर राजे झाले. त्यानंतर साम्राज्याचे विभाजन झाले. कार्नटकचा प्रमाख नरसिंह त.तीय व तमिळ प्रदेशाचा राजा रामनाथ झाला. नरसिंह त्तीयने जैन मंदिराला व विद्वानांना दान दिले. त्याने त्रिकुट रत्नश्रय शंतिनाथ जिनालयाला संरक्षणर्थ १५ गाव दान लिी. शंतिनाथचे नवीन मंदिर बांधले. केश्रिा व कुमुदेन्दु या विद्वानांनी राजाच्या आश्रयामुळे अनुक्रमे शब्दमण्दिर्पण (कन्नड व्याकरण्) व कन्नड जैन रामायण लिहिले. रामनाथनेही जिनालयांना स्वर्णदान केले.

नरसिहं तृतीयानंतर त्याचा पुत्र बल्लाळ तृतीय (१२९१-१३२३) हा शेवटचा उल्लखनीय राजा होय. त्याचा महाप्रधान जैन होते. त्याने जिनलयाला दान दिले. जैन विद्वान रट्कवीने प्रकृती विज्ञानावर रट्टसुत्र वा रट्टमाला याच काळात लिहिली. तथापि या नतंर होयसळ राज्याची सत्ता कमकुवत होत गेली. १३१० मध्ये अल्लाउद्दीन ख्लिजीने केलेल्या आक्रमणामुळे हे साम्राज्य नष्ट झाले. लहान लहान स्थानीय सत्तेच्या स्वरूपात होयसळ सत्ता काही काळ अस्तित्वात होती.

**विजयनगर राज्यातील जैनधर्म-**

विजयनगर साम्राज्याच्या स्थापनेच्या वेळी जैनधर्म तामिळ, कर्नाटक इत्यादी प्रदेशातून काहीसा कमी होऊ लागाला होतो व दुसऱ्या कोणत्याही सुरक्षित स्थानाची कल्पना नव्हती. या काळात आचार्य सिंहनंदीप्रमाणे मार्गदर्शन करणारा कोणताही धर्मगुरू नव्हता. यावेळी जैनधर्माच्या संरक्षणाच्या बाबतीत विजयनगरने पुढाकार घेतला व जैन स्थिती सुधारण्यास मदत केली. विजयनगर हिंदू राज्य होते, तथापि त्यांची नीति उदार होती.

१३६८ मध्ये बुक्करायनी दिलेल्या एका निर्णयाची शिलालेखात माहिती दिली आहे. त्यात म्हटले आहे की, जैनधर्म पूर्ववत पंच महाशब्द व कलशाला पात्र आहे. जर वैष्णवांनी त्याला काही हानी पोहचविली तर तो ती आपली हानी समजेल. जैन व वैष्णव एक आहेत. त्यात भेद करून नये. या आदेशाला जो मानणार नाही तो राज, समाव व सर्वांचा शत्रु समजला जाईल. बुक्कराजाच्या या निर्णयाचा समाजावर व्यापक व स्थायी प्रभाव पडला. त्यानंतरच्या शिलालेखात जिन बरोबरच शिवाची स्तुती आढळते.

**सत्ताधीशांकडून जैनधर्माला सहाय्य -**

बुक्कराजाच्या उदाहरणाचा प्रभाव त्यांच्य उत्तराधिकाऱ्यवरही पडला. त्यामुळे विजयनगरचे राजे, राण्या व राजपुरूषांनी जैनधर्माचे संरक्षण केले. त्यातही राण्यांचा प्रमुख भाग आहे. देवराजची पत्नी भीमादेवी स्वत: जैन होती. १४१० मध्ये तिने श्रवणबेळगोळच्या मंगायी वस्तीसाठी शंतिनाथ भगवानची मूर्ती निर्माण केली होती. या मंदिराची निर्मिती १३२५ मध्ये श्रवणबेळगोळच्या मंगायी नावाच्या राजनर्तकीने केली होती. भीमदेवीमुळे राजा देवरायही जैनधर्माच्या बाबतीत सहिष्णू होता. विजयनगरच्या राजांनी श्रीवण्बेळगोळच्या बाबतीत आदर होता. १४२० मध्ये देवराज याने गोमटेश्वराच्या पूजेसाठी एक गाव दान दिले होते. १४२४ मध्ये देवराज द्वितीय याने वरांग येथील नेमिनाथाच्या वस्तीसाठी ग्रामदान केले होते.

कृपण देवराज याने कंजीवरम तालुक्यातील त्रैलोक्यनाथाच्या मंदिराला दोन गावे प्रदान केली होती. १५२९ मध्ये त्याने चिप्पगिरी ग्रामातील वस्तीला दान दिल्याचा उल्लेख मिळतो. जैन सेनापती इरूगप्यने एक मंदिराची निर्मिती केली तर वीर हरिहररायच्या राणीने १३९७ मध्ये या मंदिराला दान दिले. श्रवणबेळगोळच्या १४२२ च्या शिलालेखात इरुगप्यविषयी वर्णन आहे. ती संस्कृत विद्वान असून, नानार्थरत्नमाला नावाच्या पद्यात्मक कोषाची रचना त्यान केली. इरुगप्पचा मोठा भाऊ बैचय याने बेळगोळच्य गोमट स्वामीच्या पूजेसाठी वृत्ति प्रदान केली होती.

महाप्रधान गोप चमूप याने मूलसंघ देशीय गणाचे विध्दांताचार्य यांना गुरू मानले होते व तो जैनधर्माचा सेवक बनला. त्योन कुप्पटूर येथे जिनालयाची निर्मिती केली. याशिवाय बायिनाडचा स्वामी कंपण, वल्लभराजदेव इत्यादी विजयनगरचे राजे व शासकीय अधिकाऱ्यानीही १६ व्या शतकापर्यंत जैनधर्माच्या बाबतीत आपली श्रध्दाच ठेवली.

**मांडलिक राजकडून संरक्षण** -

विजयनगर राज्याचे अनेक मांडलिक जैनधर्मी होते. त्यांच्या दोन श्रेणी होत्या. एका श्रेणीत कोंगाल्व, चंगाल्व, संगीतपुरचे सालुव, गेरसोप्पेचा राजा, कारकलचे भेररस, दुसऱ्या श्रेणीत अवलिनाड, कुप्पटूर वगैरेचे महाप्रभु व अन्य लहान मांडलिक होते. यात मांडलिकांच्या महाराण्यांचाही समावेश होता.

१३९० मध्ये कोंगाल्व सत्ताधिशांनी मुल्लुरच्या चंद्रनाथ वस्तीचा जीर्णोध्दार केला, त्याची राणी सुगुनी देवीनी चंद्रनाथाची स्थापना करून त्याच्या पूजेच्या प्रबंध केला.

चंगाल्व राजाचा सेनापती मंगरस कन्नड भाषेचा विद्वान व जैनधर्माचा संरक्षक होता. त्याने अनेक तलाव व जैन मंदिरे बांधल्याची माहिती मिळते. त्याने एक वस्ती निर्माण करून त्यात पार्श्वनाथ व पद्मावतीची मूर्ती स्थापन केली होती. त्याने जयनृप काव्य, प्रभंजन चरिते, श्रीपाल चरिते, नेमिजिनेश संगति व सम्यक्त्व कौमुदी इत्यादींची रचना केली होती.

१४८८ मध्ये संगीतपुरच्या महामंडलेश्वर सालुवेंद्र राजाने एक उत्तुंग चैत्यालयाची निर्मिती केली होती. त्याच्या पद्म नावाच्या मंत्र्यांनी पद्माकरपुर नावाच्या गावात चैत्यालयाची निर्मिती केली व त्यात पार्श्वनाथ भगवानची मुर्ती विराजमान करून राजाकडून बक्षिस म्हणून मिळालेला गाव या मंदिराच्या पूजेसाठी दान दिला.

राज श्रीशैल वीरशैव असला तरी जैनधर्माचा सहाय्यक होता, त्यामुळेच विजयनगरच्या साम्राज्यात जैनधर्माला सफलता व सहयोग मिळाला. १४ व्या शतकाच्या मध्यापासून १७ व्या शतकाच्या सुरूवातीपर्यंत मिळणाऱ्या शिलालेखात नागरिक व प्रमुख पुरूष यांनी जैनर्ध्मासाठी केलेल्या बहुतांशी प्रयत्नाचा उल्लेख आहे. त्या अगोदर महिलांनी जैनधर्म प्रसारार्थ केलेले कार्य पाहू सोहरब वंशच्या महिला काललदेवी झाली , जी कारकलच्या राजा भैरासची लहान बहीण होती. १५३० मध्ये तिने आपल्या शासित प्रदेशात जैनधर्माला स्थायी ठेवण्यासाठी विशेष प्रयत्न केले. कल्ल वस्तीचे पार्श्वनाथ्देव काललदेवीचे वंशगतदेव होते. आपली मुलगी रमादेवीच्या मृत्यूच्या वेळी काललदेवीने आपल्या वंशगत जिनेंद्र देवाच्या पूजेसाठी मोठे दान दिले.

**विजयनगरात जैन धर्माची स्थिती** -

विजयनगर राज्यात विभिन्न नगररामध्ये जैन धर्माचा जसा प्रभाव होता तसा राजधानीच्या किंवा प्रांतीय शासनाच्या प्रमुख ठिकाणीही नव्हता. नागरिकांनी जैनधर्माला आवश्यक ते सर्व सहाय्य दिले. बेलगोल, कल्लेह, होसपट्टण, हरवे, मलेयून, हुण्सून, आवडी, सोहराव, हिरेचोटी, कुप्पटूर, उध्दरे, हुलिगेरे, रामदुर्ग इत्यादी ठिकाणी १४ व्या शतकापासून जैनधर्म अत्यंत प्रभावशील होता. श्रवणबेळगोळला सर्वोत्कृष्ट तीर्थस्थान मानले जाई व दूरदूरचे यात्री तेथे येत१. कल्लेह जैनधर्माचे प्रधान केंद्र होते. होसपट्टण ही विजयनगरीच राजधानी जैनधर्माचे प्रसिध्द केंद्र होते. चामराजनगर विजयनगर राजकालीन उल्लेखनीय नगर होते. तेथे एक पार्श्वनाथ वस्ती होती. १५१० मये या वस्तीला अरिकुठारच्या महाप्रभु वीरण्ण नायकानी दान दिले. हरप्पे येथे आदि परमेश्वराचे चैत्यलय होते. स्वामी सोमरायने या मंदिराला दान दिले होते. त्याचा पुत्र गज्जेराजनी जमीन विक घेऊन मंदिराला दिली होती. याच तालुक्यातील मलेयुर जैन केंद्र असून, येथील कनकगिरी पर्वतावर चंद्रप्रभाची वस्ती होती. कोपणच्या चंद्रकिर्ती देवाने कनकगिरीवर चंद्रप्रभाची मूर्ती बसविली. १३५५ मध्ये येथे विजयनाथाची मूर्ती बसविण्यात आली.कनकगिरी बऱ्याच काळपर्यत जैनधर्माचे पूज्य स्थान होते.

आवडीनाड हे जैनाचे पूज्य स्थान होते. येथील जनता व राजा जैन गुरूच्या उपदेशाचे पालन करीत असत. कुप्पटूर येथे जैन चैत्यालय होते. त्याला कदंबानी दान दिले होते. १४०८ च्या शिलालेखात जैनानी या ठिकाणाला सुंदर नगराच्या रूपात परिवर्तित केले अशी माहिती आढळते. सोहराब मालुल्यातील उध्दरे होयसळाच्या वेळी जैनांचे माहन स्थान होते. बैचपचा पुत्र सिरियण्ण जैनधर्मीय होता व त्याने जैनधर्माप्रमाणे प्राणत्याग केला.

पंधराव्या शतकाच्या जैनधर्म प्रसारावरून स्पष्ट होते की, कर्नाटकात जैनधर्म लोकप्रिय होता. त्या काळात मत्तावर, वनवास, गेरसोप्पे, भारंगी, मूडबिद्री, कोल्हापूर, बंदनिके, पावगुड व मेलूकोटे इत्यादी ठिकणे जैनधर्माची प्रसिध्द केंद्रे म्हणून मानण्यात आलेली होती या ठिकाणांनी जैनधर्माच्या इतिहासात महत्वाचे कार्य केले आहे. सोहाव्या शतकाच्या प्रारंभी कोषण, नरसिंह राजपूर व श्रृंगेरी ही जैनाची केंद्रे प्रसिध्दीला आली. श्रृंगेरी प्राचीन असून तेथे शांतिनाथाची वस्ती होती. तेथे चंद्रनाथ व पार्श्वनाथ वस्तीही होती. जैन यात्री येथे येत असत. १५२३ मध्ये येथील जिनालय जिनबिंबाची स्थापना करण्यात आली.

कारकल हेही जैनाचे प्रमुख केंद्र व १४ व्या शतकातील शांतर राजाची राजधानी होते. येथील राजा लोकनाथरसने जैन धर्माचा प्रसार करण्याचे कार्य केले. त्याच्या राज्यकाळात त्याच्या दोन बहिणीनी शांतिनाथ मंदिराला भूमिदान केले. या मंदिराची निर्मिती मूलसंघ काणूरगणाच्या भनुकिर्ती मलधारी देवाचे शिष्य कुमुदचंद्र भट्टारकानी केली होती. भैरवेंद्रचा पुत्र वीरपाण्डनी १४३२ कारकल येथे गोम्मट स्वामीच्या उत्तुंग मूर्तीची स्थापना केली व त्याच भट्टारकाच्या प्रेरणेने १४७५-७६ मध्ये तीर्थकर वस्तीच्या पुढे मुख्यमंडप बांधला गेला. कारकल तालुक्यातील वेणुह नावाच्या ठिकाणी तिम्मराजने गोम्मटाची मूर्ती स्थापन केली आहे.

**विजयनगरच्या साम्राज्याला जैनांचे योगदान -**

विजयनगरच्या पूर्वी कला व संस्कृतीच्या बाबतीत जैनांचे वैशिष्ठचपूर्ण योगदान आहेच. दक्षिणेतील दिगंबर जैनांनी गृहनिर्माण केलेत काही विशेष संयोजन वस्ती व मूर्तीद्वारे केले आहे. वस्ती त्या मंदिराला म्हणतात ज्यात, चोविस तीर्थकारापैकी कोणत्याही एक तीर्थकाराची मूर्ती विराजमान आहे. जैन वस्ती-मूर्ती भारतीय स्थापत्य कलेत प्रसिध्द आहेत. जैनांनी श्रवणबेळगोळ, कारकल व वेणूर येथे बाहुबलीच्या विशाल मुर्ती बनविल्या. या मूर्तीची काही वैशिष्ठ्ये आहेत. या मूर्ती नग्न उत्तराभिमूख माधवी वेलीनी पाय व हात वेष्ठित आहेत. त्या एका आदर्श साधूच्या प्रतिकृती आहेत जो ध्यानात मग्न आहे व पृथ्वीवर उगवलेल्या लतांनी आपल्या आलिंगनानी त्याला बध्द केले आहे. त्याला गोमटेश्वर म्हणतात.

मूडबिद्रीची वस्ती महत्वाची आहे. पाहताच वाटते की, ही वस्ती लाकडाची बनविलेली असावी. डॉ. फर्ग्युसन हे मान्यवर कालभिज्ञ म्हणतात, मूडबिद्रीचे मंदिर विविधता व सुंदरतेच्या दृष्टीने परिपूर्ण आहे. त्यापेक्षा उत्कृष्ट कोठेही असणार नाही. त्याची बनावट ऐच्छिक आहे व रचना सुदरतेच्या दृष्टीने एक स्तंभ दुसऱ्यापेक्षा भिन्न आहे. जैन स्थापत्य कलेतील स्तंभ ही दुसरी विशेषता होय स्तंभ दोन प्रकारचे आहेत, एक ब्रह्मस्तंभ व दुसरे मानस्तंभ. सितरे वैशिष्ठ्ये मूडबिद्रीजवळ आढळणाऱ्या गुरूच्या समाध्या होत. काही समाध्या तीनपासून पाच ते सात मजली उंच आहेत. याप्रकारच्या समाध्या भारतात अन्यत्र कोठेही पहावयास मिळत नाहीत. मध्यकालीन भारताला कला क्षेत्रातील जैनाचे हे अनुपम योगदान आहे.

विजयनगर साम्राज्याच्या काळात जैनधर्म मोठ्या प्रमाणात प्रचलित होता याचे श्रेय जैन गुरूला आहे. दिल्लीच्या बादशहाच्या दरबारात सिंहकीर्ति, विशालकीर्ति व विद्यानंद यांनी जैनधर्माचा प्रमसार केला. सिंहकीर्तिनी सुलतान मुंहमद तुघलकाच्या दरबारात बुध्दांना पराभूत केले. विशालकीर्तिनी सिकंदर सुरिमाणकडून सम्मान प्राप्त केला. विद्यानंदीनी अनेक सम्मान प्राप्त केले होते. चौदाव्या शतकात बाहुबली पंडिताने धर्मनाथ पुराण, केशववर्णीयाने गोम्मटसारावर कर्नाटक वृत्ति, अमितगतिने श्रावकाचार व सारत्रयावर टीका, अभिनव श्रुतभूतिने मल्लिषेणाच्या सज्जनचिततवल्लभवर टीका, आयतवर्मानी कन्नडमध्ये रत्नकरंडक, चंद्रकीर्तिने ज्ञानचंद्राभ्भूदय, कामनकभे, अनुप्रेक्षा, जिनस्तुती व तत्वभेदाष्टकाची रचना केली. त्यानी लिहिले आहेकी, मी राजा पांड्यच्या प्रेरणेने ज्ञानचंद्राभ्युदय व कामनकथेची रचना केली याच सुमाराला जिनदेवण्णने श्रेणिकचरित, विजयण्णने द्वादशनुप्रेक्षा, विद्यानंदीने प्रायश्चित्त नामक कन्नड टीका. बोम्मरसच्या शिष्यानी सनत्कुमार चरित जीवधंर चरिते यशकीर्तीने धयर्मशर्माभ्युदयवर टीका लिहिली. साल्वने भारत, शारदा विलास, नेमीश्वर चरीत व दोड्डमने चंद्रप्रभ चरिताची रचना केली.

मूडबिद्रीच्या रत्नाकर वर्णीने दहा हजार पद्यात त्रिलोक शतकाची रचना केली. नेमण्णने ज्ञानीस्कर चरिताची रचना केली. बाहुबलीने नागकुमार चरित लिहिले. १६ व्या शतकात ही अनेक जैन ग्रंथकार झाले श्रुतकीर्तीने विजयकुमारी चरित व दोड्डणांकने चंद्रप्रभ षट्पदीची रचना केली. सतराव्या शतकात पंचबाणने भुजबली चरित लिहिले. त्यात श्रवणबेळगोळ व कारकलच्या गोम्मटस्वामी मस्तकाभिषेकचे वर्णन आहे. देवरसने गुरुदत्त चरित लिहिले१.

जैनांनी केवळ धर्म व साहित्य साम्राज्याच्या काळात राजे, मांडलिक, शासकीय अधिकारी व नागरिक इत्यादींनी दिलेल्या सहकार्याने जैनधर्माचा सर्वांगीण विकास झालेला दिसतो. या काळात या सहकर्यामुळेच अनेक जैन मंदिरे बांधली गेली. मूर्तीची स्थापना झाली. जैनाचार्यानी साहित्य क्षेत्रात असामान्य कार्य केले व कला साहित्य इत्यादी क्षेत्रात दैदिप्यमान कार्य करून जैनांनी विजयनगर साम्राज्याला परिपूर्ण केले.

**दक्षिण भारतातील प्रसिध्द जैन स्थाने** -

दक्षिण भारतात सुरूवातीपासूनच जैन धर्माचा प्रभाव मोठया प्रमाणात होता. श्रवणबेळगोळ, पोदनपुर, कोप्पल, पन्नाड, हनसोगे, तलकाद, हुमच, बल्लिगामे कप्पटूर व वनवासी इत्यादी या प्रदेशातील जैनांची प्रसिध्द केंद्रे होती. ही ठिकाणे तीर्थस्थाने म्हणूनही प्रसिध्द आहेत. त्यातील श्रवणबेळगोळ व कोप्पल ही महातीर्थे समजली जातात.

श्रुतकेवली भद्रबाहूचा श्रवणबेळगोळशी संबंध आहे. येथेच त्यांनी समाधिमरण स्वीकारले. इ.स.६०० चा एक शिलालेख चंद्रगिरी पर्वतावर असून त्यात ही सर्व माहिती दिलेली आहे. त्याच्या पुढे विध्यगिरी पर्वतावर चामुंडरायांनी स्थापन केलेली गोमटेश्वराची उत्तुंग मूर्ती आहे. भगवान ऋषभदेवाचे पुत्र भरताने आपला लहान बंधु बाहुबलीची ५२५ धनुष्य उंचीची मूर्ती पोदनपूर येथे स्थापन केली होती. त्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ चामुंडरायने श्रवणबेळगोळ येथे बाहुबलीची उत्तुंग मूर्ती स्थापन केली होती.

श्रवणबेळगोळ नंतर दुसऱ्या क्रमांकाचे महत्वाचे महातीर्थ कोप्पल होय. जे सध्या कोप्पळ या नावाने प्रसिध्द आहे. सातव्या शतकापासून सोळाव्या शतकापर्यंत हे ठिकाण जैनधर्माचे महान केंद्र म्हणून प्रसिध्द होते. शिमोगा जिल्हयातील मिळालेल्या एका शिलालेखानुसार हे ठिकाण जैनधर्माच्या लाख तीर्थस्थानामधील अग्रगण्य होते. तेथे अनेक जैन मंदिरे होती. दंतकथेनुसार त्यांची संख्या ७२२ होती. येथे निरनिराळया ठिकाणचे साधु व गृहस्थ धार्मिक कृत्य करण्यासाठी येत होते. कोप्पळशी संबंधित पालकीगुंडु पहाडावर अशोकाच्या शिलालेखाजवळ दोनचरणचिन्ह असून त्याखाली पूर्वीच्या कन्नड मधील दोन ओळीचा एक शिलालेख आहे. त्यात लिहिले आहे की, चावय्यनी जयसिंहनंदीच्या चरणचिन्हांना अंकित केलेल आहे. हे जयसिंहनंदी वरांग चरिताचे कर्ते होत. शासक व अधिकारी येथे जिनमंदिराची निर्मिती करीत होत असे

दिसते. सध्या जेथे व्यंकटेश मंदिर आहे, ते प्रथमत: जैन मंदिर असावे, कारण त्याच्या स्तंभावर अनेक जैन मूर्ती कोरलेल्या आहेत.

येडतोरे तालुक्यातील चिक्क हनसोगेही जैनधर्माचे केंद्रे होते. तेथे ६४ जिनमंदिरे होती. सध्या सर्व नष्ट झाली आहेत. नगर तालुक्यातील पवित्र तीर्थ म्हणजे हल्लीच्या नगरच्या उत्तरेस बावीस मैलावर पोम्बच्च नावाचे स्थान हे होय, ज्याला संध्या हुमच म्हणतात. नवव्या व दहाव्या शताब्दीतील हे जैनधर्माचे एक प्रमुख केंद्र होते. तेथील सर्वात प्राचीन मंदिर इ.स.८७८ मध्ये बनविण्यात आले. आजही तेथील विशाल मठ, पार्श्वनाथ व पद्मावतीचे मंदिर अत्युत्तम अवस्थेत आहे.

११ व्या शतकात बल्लिगामे जैनधर्माचे प्रमुख केंद्र होते. राजा विक्रमादित्य सहावा याने येथील चालुक्य गंग पेरम्माडि जिनालयाला दान दिले होते. होयसळ राजा वीर बल्लाळच्या अधिकाऱ्यानीही काही गावे दान दिली होती. हे दान मल्लिकामोद शांतिनाथ भगवानाच्या पूजेसाठी दिलेले होते. सध्या तेथे खंडित जैन मूर्तीशिवाय अन्य कोणतेही अवशेष नाही.

हैद्राबाद प्रदेशात उल्लेखनीय म्हणजे पुरातत्त्वीय जैन गुंफा होत. वेरूळाच्या गुंफा मंदिराचा काळ ८ ते १३ व्या शतकापर्यंत मानला जातो. जैन गुफात पार्श्वनाथ तीर्थकरांची विशाल मूर्ती आहे. त्याच्या खाली इ.स.१२३४-३५ चा शिलालेख आहे.

उस्मानाबादजवळ प्रसिध्द सात गुंफा आहेत. त्यातील चार जैन गुंफा आहेत. या इ.स.पू. ५व्या शतकातील असाव्यात, कारण करकंडु चरित मध्ये लिहिले आहे की, अंग देशाचा राजा करकंडू तेरपूरला आला व तेथे त्याने दोन गुंफा पाहिल्या. बौद्ध व जैन दोघांनाही हे मान्य आहे. या गुंफामध्ये महावीर तीर्थकरांची मूर्ती नाही. यावरून या गुंफा निश्चितपणे इ.स.पू ५ व्या शतकातील असाव्यात असे म्हणता येते.

विजापूर जिल्ह्यातील होनवाड नावाचे ठिकाण ११ व्या शतकाच्या मध्यापासून त्रिभुवन तिलक जिनालयामुळे प्रसिध्द आहे. हे मंदिर शांतिनाथ भगवानाचे होते. त्याच्या शेजारीच पार्श्वनाथव सुपार्श्वनाथाची जिनालये होती. हे मंदिर चाकिराजाच्या धार्मिक उत्साहामुळे बनविले होते. सोमेश्वर प्रथमची राणी केत्तलदेवीचा चाकिराज हा एक अधिकारी होता व जैनधर्मीचा अनुयायी होता.

बेळगाव जिल्हा व त्याचा आसपासचा प्रदेश शिलाहार व रट्ट वंशाच्या शासकांच्या ताब्यात होताव हे राजे जैनधर्मीय होते. खानापूर तालुक्यातील हलसी नावाचे ठिकाण जैनधर्मीचे केंद्र होते. याचे पूर्वीचे नाव पलासिका असून तेथे मिहालेल्या अनेक ताम्रपटात जिन स्तूती असून, जैन मंदिराना दान दिल्याचा उल्लेख आहे. रविवर्मा आपल्या पूर्वजापेक्षाही जास्त जैनधर्मानुयायी असून, त्याने जैनधर्म महात्सव करण्यासाठी साधूना आहार देण्याविषयी आज्ञा काढल्या होत्या.

सौदत्तीचे पूर्वीचे नाव सौगन्धवर्ती होते. नवव्या शतकापासून हे स्थान हलके हलके जैनांचे महान केंद्र बनण्यास सुरूवात झाली. येथील रट्टवंश पूर्वीपासूनच जैनधर्मानुयायी होता. महासामन्त पृथ्वी राय हा इष्अकीर्तीचा शिष्य होता. त्याने एक जिनलय निर्माण करून त्या भूमि प्रदान केली होती. इंद्रकीर्तीचे पूर्वज कारेयगणाचे होते, यावरून सौदत्ती नवव्या शतकापासून यापनीय संघाचे प्रमुख केंद्र होते. शांतिवर्मा या कल्याणीच्या चालुक्याच्या मांडलीकर्ईने सौदत्तीला एक जिनालय बांधून त्याच्या प्रबंधासाठी भूमिदान केली होती. रविचंद स्वामी, अर्हनंदी, शुभचंद्र, सिध्दांतदेव, मोनिदेव व प्रभाचंद्र या इतर गुरूंचाही येथे असल्याचा उल्लेख मिळतो. रट्टवंशातील निरनिराळया राजांनी या मंदिराचे संरक्षण करून निरनिराळया दानाच्या स्वरूपाने त्या मंदिराचा योग्य प्रबंध केल्याची माहिती मिळते.

गोकाक तालुक्यातील हुली या गावी यापनीय संघाच्या दोन विभिन्न संघाचे आचार्य रहात होते. तेरदाल रट्टवंशीय शासक समृध्द, श्रीमंत व व्यापारी यांच्या सहकार्याने ११ व्य व १२ व्या शतकातील प्रसिध्द केंद्र बनले होते. येथील गोंक राजा जैनधर्मीय होता. गोंकने तेरदाल येथे नेमिनाथाचे मंदिर बांधले व साधूंना आहार देण्यासाठी भूदान केले. निंबदेव हा जैनधर्मीय असून, त्याने प्रथम कोल्हापूरात रुपनारायण जिनमंदिर वस्तीची निर्मिती करून आपले धर्म प्रेम स्पष्ट केले. ११३५ मध्ये पार्श्वनाथाचे मंदिर बांधले.

कोल्हापूर प्राचीन काळापासूनच जैनधर्माचे केंद्र होते व आजपर्यतही ते कायम आहे. जैन समाजाच्या चार मुख्य मठामध्ये त्याचे नाव आहे. येथील १७७४ च्या एका शिलालेखात भट्टरकांचा उल्लेख असून, त्यांना दिल्ली, करवीर (कोल्हापूर) जिनकांची व पेतुगोंडचे सिंहासनाधीश्वर म्हटले आहे.

धारवाड जिल्ह्यातील गदग ताल्यक्यात मुलगुद प्राचीन काळापासून जैनधर्माचे प्रसिध्द केंद्र आहे. राष्ट्रकूट राजा कृपण द्वितीयने ९०२-०३ मध्ये एक उत्तुंग जिनालय बांधले व त्याचा पुत्र अरसार्यनी त्याच्या प्रबंधाची व्यवस्ाि केली. हे दान चंद्रिकावाटच्या कनकसेनानी दिले होते. कनकसेन वीरसेनाचे शिष्य व वीरसेन कुमारसेनाचे शिष्य होते. चामुंडरायाच्या पुराणाच्या प्रारंभी कुमारसेनाची उल्लेख आहे. १२-१३ व्या शतकात धारवाड तालुक्यातील मंगुंडी नावाचे स्थान जैनधर्माचे प्रमुख केंद्र होते. येथे एक जिनालय असून यापनीय संघाच्या ताब्यात होते.

मद्रासमधील अडोनी तालुका पूर्वीपासूनच जैनधर्माने प्रभावित होता. येथे मिळणारे जैनावशेष उल्लेखनीय आहेत. अडोनी बारकिल्ल पहाडावर गुंफा खोदून बनविलेले एक मंदिर आहे. त्यात तीर्थकरांच्या मूर्ती आहेत. या तालुक्यात मिळालेल्या शिलालेखात राणी चंद्रामब्बे हिने नंदवर येथे एक जैन मंदिर बांधल्याची माहिती दिली आहे. त्याच्या प्रबंधनार्थ तिने दानही दिले होते.

हडगल्ली तालुक्यातील कोगली प्राचीन काळापासूनच जैनधर्माचे प्रमुख स्थान आहे. तैलप द्वितीयच्या काळातील शिलालेखात येथील मंदिराला भूमिदान दिल्याची माहिती आढळते. मंदिरातील

स्तंभलेखत पार्श्वनाथाच्या पूजेसाठी प्रतिदिन दान देणाऱ्या व्यक्तींची नावे आहेत. त्यात समाजातील सर्व वर्णाचे लोक आहेत.

याशिवाय नंदि, बेबरू, कोंडकुंडे, मडक शिरा, अमरापुरम, पारशिवम, हळ्ळी, वरूण, कलसतवाडु, चामुंडा नावाचा पर्वत इत्यादी दक्षिण भारतातील जैनाची प्रसिध्द तीर्थ होती व आहेत. अर्थात याशिवायही अनेक महत्वाची व प्रसिध्द तीर्थस्थाने आहेत. तथापि विस्तारभ्यास्तव त्याचे विश्लेषण दिले नाही. इतिहास साधनांच्या आधाराने उपर्युक्त तीर्थाचे वर्णन केले असून त्यांचे प्राचीनत्व दाखविले आहे१.

**बृहत्तर भारत** -

प्राचीन काळापासून मौर्य काळ ते गुप्तकाळापर्यतच्या प्राचीन भारतीय इतिहासाकडे दृष्टीक्षेप टाकल्यास त्यावेळी भारतीय प्रदेशाबरोबरच अफगाणिस्तान (कपिशा) गांधार, बलुचिस्तान, काश्मीर, तिबेट, नेपाळ, भूतान, ब्रह्मदेश व लंका इत्यादि प्रदेशही भारतीय संस्कृतीच्या प्रसाराचे क्षेत्र मानले जात होते. याशिवायही मध्य एशियातील काशगर, खोतान, यास्कंद येथे भारतीय सत्ता स्थापन झालेली होती. जावा, बाल्ली, बोर्निओ इत्यादि द्विपामध्ये भारतीय राजकीय सत्तेची स्थापना झालेली होती. आग्नेय आशियातील राज्ये ही भरतीय राज्यांच्या मानाने मागासलेली होती. या प्रदेशात राहणाऱ्या समाजाला सुसंस्कृत बनविण्याचे कार्य भारतीय संस्कृतीने व समाजाने केले. इतकेच नव्हे तर रोम, इराण इत्यादि देशात भारतीय संस्कृतीचा अभूतपूर्व प्रसार झाला. संपूर्ण जगासाठी भारतातील धर्म, संस्कृति, विद्या इत्यादीनी प्रकाशस्तंभाचे कार्य केले. दूरदूरच्या देशातील शेकडो विद्यार्थी भारतीय विश्वविद्यालयामध्ये विद्यासंपादनार्थ येऊ लागले. तसेच भारतीय व्यापारी, साहसी वीर, विद्वान व धर्मोपदेशक निरनिराळया देशामध्ये समुद्र मार्ग व खुष्कीच्या मार्गाने जात येत असत. अशा प्रकारे त्यांनी भारतीय व्यापार, व्यवसाय, धन-समृध्दी, शक्ति व प्रभावाची वृध्दि करू बृहत्तर भारताची निर्मिती केली.

इ.स.पू. ६ व्या शतकापासून मुसलमान आक्रमणापर्यंत जवळ जवळ दीड हजार वर्षाच्या काळात भारतात ब्राम्हण, जैन, बोध्द हे तीन प्रमुख धर्म होते. ज्या व्यापारी, साहसी वीर, धर्मोपदेशकांनी बृहत्तर भारताची निर्मिती, विकास व संरक्षण केले, त्यात या तीनही धर्माचे लोक होते. भारताचा प्रभाव ज्याच्या देशात आढळतो तेथे या तिन्ही धर्माच्या विचारांचा तत्वज्ञानाचा प्रसार व प्रभाव आढळतो. मध्यंतरीच्या जैनधर्मशास्त्रख पुराणे इत्यादींच्या धार्मिक प्रतिबंधामुळे बृहत्तर भारतात बोध्दधर्माचा प्रसार मोठया प्रमाणात झाला. तथापि चिनी यात्रेकरूंनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रदेशात जैन निर्ग्रंथ साधूंचे अस्तित्व कायम असलेले दिसते. जैन मूर्ती व जैन अवशेषही अनेक ठिकाणी आढळतात. अनेक पुरातत्वीयांच्या मते जैनधर्म प्राचीनकाळात या प्रदेशात पसरलेला आसावा. तिबेट, अफगाणिस्थान, गांधार, इराण, मध्य एशिया या प्रदेशात जैनधर्माच्या अस्तित्वाच्या काही खुणा आढळतातच. जैनाच्या लहान वस्त्याही मध्यकाळात तेथे होत्या.

सिंहलद्वीप किंवा लंकेमध्ये भरत चक्रवर्तीने जैनधर्म व श्रमण संस्कृतीचा प्रसार केल्याची माहिती मिळते. जैन अनुश्रुत्यनुसार लंकेचा राजा रावण व त्याचा वंश जैनधर्मी होता. करकंडूनेही लंकेची

यात्रा केली होती. इ.स.पू. ४ थ्या शतकात लंकेचा राजा पांडुकाभय याने आपल्या अनुराधापूर या राजधानीत जैन विहार व भव्य जैन मंदिराची स्थापना केली. अशोकाच्या काळात लंकेत बोध्दधर्माचा मोठया प्रमाणात प्रसार झाला. जैन पुराण व कथा ग्रंथात सिहलद्वीप व रत्नद्वीप इत्यादि द्वीपामध्ये जैन व्यापाऱ्यांनी व्यापारार्थ गेलयाची सिंहलद्वीपातील राजांचे भारतीय राजाबरोबर परस्पर संबंध असल्याची माहिती दिलेली आहे. इ.स. ७ व्या ८व्या शतकात जैनधर्म व जैनीयांचे अस्तित्व सिंहलद्वीपामध्ये होते याचे स्पष्ट पुरावे मिळतात. मध्यकाळाच्या सुरूवातीला आचार्य यश:किर्तीचा तत्कालीन राजानी येथोचित सन्मान केला अशी माहिती देणारा शिलालेखही मिळतो. तमिळनाडूच्या प्रदेशाप्रमाणेच लंकेबरोबरही जैनांचा संबंध असलेला दिसतो.

¯ूर्वेकडील मलाया, ब्रह्मदेश, सयाम, कंबोडिया, चंपा, श्रीविजय इत्यादी बेटाबरोबर व्यापार करण्यात जैनधर्मीय व्यापारी असल्याची माहिती जैन साहित्यात आढळते. जैन ब्रह्मचारी, श्रावक इत्यादींनीही या प्रदेशात जैनधर्माचा प्रसार केला. पुढील काळात या प्रदेशाचे संपूर्ण भारतीयकरण झाले. मंदिरे, शिल्प, मूर्ती भारतीय कलेच्या धर्तीवर बांधण्यात आलो, भारतीय साहित्य, सामाजिक नियम व संस्था इत्यादींचाही येथील समाजजीवनावर परिणाम झाला. या साधनांचा जैन दृष्टीकोनातून विचार केल्यास अनेक साधने त्या प्रदेशातील जैन संस्कृतीच्या प्रभावाची माहिती देतात. कांबुज, चंपा येथील प्राथमिक भारतीय राजवंशाचे मूळ नाग-नागी संबंधात मिळते. कंबोडियात भारतीय संस्कृतीची स्थापना करणाऱ्या कोडिंण्याचे उल्लेख जैन साहित्य, इतिहास व अनुश्रुतीत मिळतात. बृहत्तर भारतातील या सर्व देशात मद्यमांस व पशुबळी इत्यादींचा अभाव आढळतो. देव किंवा एुध्द यासाठी जिन शब्दाचा वापर, अनेक मूर्तीचे तीर्थकाराच्या मूर्तीशी असणारे साधर्म्य, शिलालेखात पार्श्वनाथ तीर्थकरांचा उल्लेख व अध्यात्मिक विचांरांचा प्रयोग, त्या देशातील प्रचलित रामायण महाभारताच्या कथेचे जैन रामायण महाभारत कथेशी असणारे साम्यत्व, स्त्रियांना विशेषाधिकार देण्यात जैन नितीचा प्रभाव कार्तिक मासात मानला जाणारा वर्षारंभ इत्यादी गोष्टी येथील जैनधर्माचे अस्तित्व दर्शवितात. समाजात सन्माननीय बोघ्द भिक्षू, शिवाचार्य किंवा ब्राह्मण व पंडित ये तीन वर्ग होते. तिसरा पंडित वर्ग बहुधा जैन असावा. उपर्युक्त मुद्यांचे संशोधनात्मक दृष्टीने विश्लेषण केल्यास बृहत्तर भारतातील जैन धर्माच्या प्रभावाची माहिती मिळू शकते. सामान्यत: भारतीय धर्म व संस्कृतीने बृहत्तर भारतातील निरनिराळया समाजघटकांना सर्वागिण प्रगत करण्याचे जे कार्य केले त्यात जैनधर्मीयांचा निश्चितपणे समान वाटा आह